



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६४ वे * अंक २१३ * नांदेड * शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मुंबई येणार, ओबीसीतूनच आरक्षण घेणार, जरांगेंचा पुन्हा निर्धार

**मुंबई (प्रतिनिधी)–** मराठा आंदोलक आणि मराठा आरक्षणाचा लढा देणारे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात आता पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठीचा लढा उभारला जाणार आहे. त्यासाठी, मुंबईत २९ ऑगस्टला राज्यभरातून मराठा बांधवांना येण्याचं आवाहनही मनोज जरांगे यांनी केलं आहे. येत्या, २९ ऑगस्ट रोजी आरक्षण घेणार ते पण ओबीसीतूनच. राज्यात मराठा आणि ओबीसी समाजामध्ये दंगल घडली तर त्याला मुख्यमंत्री आणि सरकार जबाबदार असेल, अशा शब्दांत जरांगे पाटलांनी राज्य सरकारला आणि मुख्यमंत्र्यांना इशारा दिला आहे.

मराठा समाजाच्या माध्यमातून २९ ऑगस्टला मुंबई चलो चा नारा देण्यात आला आहे. त्याच पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील हे पश्चिम महाराष्ट्राचा दौरा करत आहेत. सातारा जिल्ह्यातील



फलटण तालुक्यात शुक्रवारी मराठा समाजातील बांधवांना भेटण्यासाठी आणि बैठकीसाठी ते उपस्थित राहिले. त्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर टीका केली.

सरकार मराठा आणि ओबीसी समाजामध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. सरकार २९ ऑगस्टला मराठा आरक्षण कसे देत नाहीत, तेच मी पाहतो. मराठा समाजाला ओबीसी समाजामधून आरक्षण घेणार, असे जरांगे पाटील म्हणाले.

मुंबईमध्ये होणाऱ्या मोर्चामध्ये पश्चिम महाराष्ट्रातून मोठ्या संख्येने मराठा समाज उपस्थित राहणार आहे, याचा मला आनंद होत आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा या भागाचा दौरा केल्यानंतर मराठा समाजाची मोठी गर्दी मला भेटण्यासाठी येत असल्याचं पाहायला मिळालं. पश्चिम महाराष्ट्रातून जर मोठ्या ताकतीने मराठा समाज येणार असेल तर मराठवाडा विदर्भ देखील त्याच ताकतीने येईल असा मला विश्वास आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणतात ओबीसीच्या हक्कासाठी लढणार. एकंदर बरे झाले, मराठ्यांची झोप जाईल. याचा अर्थ असाच होतो की, मी मराठ्यांसाठी लढणार नाही. ओबीसींच्या हक्कासाठी लढणार, याचा अर्थ मराठ्यांच्या गोरगरीब जनतेसाठी तुम्हाला लढायचं नाही का? असा सवाल जरांगे पाटील यांनी उपस्थित केला.

## पुण्यातल्या मंचरमधील २४ मित्र बेपत्ता

**पुणे (प्रतिनिधी)–** पुण्यापासून सुमारे ६० किमी अंतरावर असलेल्या मंचरच्या आवसरी खुर्द गावातील १९९० च्या दहावीच्या तुकडीतील २४ मित्रांचा एक गट उत्तराखंडमधील उत्तरकाशी येथे मंगळवारी झालेल्या ढगफुटी आणि मुसळधार पावसानंतर बेपत्ता आहे. राज्य आपत्ती व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, महाराष्ट्रातील किमान १४९ पर्यटक उत्तराखंडमध्ये अडकले आहेत.

महाराष्ट्रातून अडकलेल्या पर्यटकांमध्ये ७६ मुंबईचे, १७ छत्रपती संभाजीनगरचे, १५ पुणे, १३ जळगाव, ११ नांदेड, ५ ठाणे, प्रत्येकी ४ नाशिक आणि सोलापूरचे, ३ मालेगावचे आणि १ अहमदनगर (अहिल्यानगर) येथील आहेत. मुंबईतील सुमारे ६१ पर्यटक सुरक्षित असून सध्या हनुमान आश्रमात आहेत. तथापि १४९ पैकी सुमारे ७५ पर्यटकांचे फोन अजूनही बंद, आउट ऑफ नेटवर्क किंवा अनरिचेबल आहेत.

# इंडिया आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे शेवटच्या रांगेत

## शिवसेना-भाजपची बोचरी टीका

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या दिल्लीतील सुनहरी बाग रस्त्यावरील शासकीय निवासस्थानी 'इंडिया'तील पक्षनेत्यांसाठी स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी त्यांनी निवडणूक आयोगावरील आरोपांचे सादरीकरण पुन्हा करुन दाखवले. यावेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे मागच्या रांगेत बसल्याने सत्ताधाऱ्यांनी टीकेची झोड उठवली आहे. शिवसेना, भाजप नेत्यांनी ठाकरेंवर बैठक व्यवस्थेवरुन निशाणा साधला आहे.

स्नेहभोजनाला राष्ट्रवादी काँग्रेसचे (शप गट) अध्यक्ष शरद पवार, खासदार सुप्रिया सुळे, द्रमुकच्या नेत्या कनिमोळी, शिवसेना (ठाकरे गट) प्रमुख उद्धव ठाकरे आणि त्यांच्या पत्नी रश्मी, सपा नेते अखिलेश आणि रामगोपाल यादव, तृणमूल काँग्रेसचे अभिषेक बॅनर्जी, नॅशनल कॉन्फरन्सचे फारूक अब्दुल्ला, पीडीपी नेत्या मेहबुबा मुफ्ती, डाव्या आघाडीचे डी. राजा नेते राहुल गांधी यांच्या घरी उपस्थित होते. यावेळी ठाकरे सातव्या रांगेत बसल्याचे फोटोंवरुन दिसते.

आमच्याकडे आमच्यापेक्षाही पहिलं त्यांचं स्थान होतं. त्याच्यामुळे आता तिथे त्यांचा काय मान सन्मान आहे? तो आपल्या लक्षात आलाच आहे. भाषणांमध्ये खूप म्हणायचं दिल्ली समोर मान झुकणार नाही. दिल्लीसमोर आम्ही पायघड्या टाकणार नाही. पण आता दिल्लीमध्ये काय परिस्थिती आहे आणि तेही सत्तेत नसताना. हे बघितल्यावर दुःख होतं. पण ठीक आहे, अशी खोचक प्रतिक्रिया यावर देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

### सुप्रिया सुळेंचा सत्ताधाऱ्यांवर पलटवार

सत्ताधारी नेत्यांचा आरोप हास्यास्पद आहे, कारण ते इनफॉर्मल गेट टू गेदर होते. याठिकाणी पवार साहेब देखील मागे बसलेले होते, अखिलेश यादव दुसऱ्या रांगेत होते. तो काही प्रोटोकॉल चा कार्यक्रम नव्हता, कुटुंबासोबत जेवणासाठी आमंत्रण होतं. त्यामुळे, ज्याल जिथे बसायला जागा मिळाली, तिथे ते बसले होते. सिनेमा बघताना आपण मागे बसता की पुढे बसता, असा सवालही सुप्रिया सुळेंनी उपस्थित केला. तसेच, आरोप करणाऱ्यांनी सिनेमा बघितला नसेल, असा टोलाही महायुतीच्या नेत्यांना लगावला.

# 'बदमाशांसारखे वागू नका,' सर्वोच्च न्यायालयाची ईडीला तंबी

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** तपास यंत्रणा अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) कार्यपद्धतीवर सर्वोच्च न्यायालयाने आज तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ईडी बदमाशांसारखे वागू शकत नाही, त्यांना कायद्याच्या चौकटीतच काम करावे लागेल, अशा शब्दांत न्यायालयाने ईडीला खडसावले. पीएमएलए कायद्यांतर्गत ईडीच्या अटकेच्या अधिकारांना कायम ठेवणाऱ्या २०२० च्या निर्णयाचा फेरविचार करण्याच्या याचिकांवर



सुनावणी करताना न्यायालयाने हे मत व्यक्त केले.

न्यायालयाने ईडीच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, त्यांच्या प्रकरणांमध्ये शिक्षेचे प्रमाण अत्यंत कमी असल्याबद्दल चिंता व्यक्त केली.

# सरकारकडून पुनर्रचित नवीन इन्कम टॅक्स कायदा रद्द

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** संसदेत सरकारने नवे इन्कम टॅक्स बिल मागे घेतले आहे. इन्कम टॅक्स १९६१ कायद्याला नवीन स्वरूप देण्यासाठी सरकारने १३ फेब्रुवारी २०२५ रोजी नव्या स्वरूपात आयकर बिल सादर केले होते त्याला तुर्तास सरकारने स्थगिती देण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या ११ ऑगस्टला बैजयंता पांडा यांच्या अध्यक्षतेखाली नवीन समिती स्थापन करुन या बिलात फेरबदल करणे अपेक्षित आहे. सरकारने यासंबंधी निर्णय घेतला आहे.

१९६१ सालच्या जुन्या आयकर कायद्याच्या फेरबदलाचा महत्वाकांक्षी निर्णय सरकारनं घेतला होता. आता त्यासंदर्भात पुन्हा एकदा सरकारने फेरबदल करण्याचे ठरविले आहे. प्रामुख्याने काही कि चकट बाबींना पुन्हा कायद्यांच्या नियमावलीत बसवून अंमलबजावणीसाठी योग्य अर्थ काढता यावा यासाठी सरकारचे हे प्रयोजन असेल. अनेकदा कायद्याच्या कक्षेत घेतले जाणारे अर्थ वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळ्या पद्धतीने घेतले जाऊ शकतात. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या सुधारित आवृत्या आणखी संदेह वाढवू शकतात. त्याचे सरलीकरण करण्यासाठी हा धोरणात्मक निर्णय सरकारने घेतला आहे.

एकूणच बिलात २८५ बदल होणार आहेत. सरकारच्या केंद्रीय मंत्रीमंडळाच्या कॅबिनेट बैठकीत या बदलांना मंजुरी देण्यात आली आहे. सरकारने याविषयी अधिपत्रकही काढले ज्यामध्ये त्यांनी या विषयी हेतू स्पष्ट करत तूर्तास नवे बिल मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला. विधेयकाच्या अनेक आवृत्त्यांमुळे गोंधळ टाळण्यासाठी आणि सर्व बदलांसह एक स्पष्ट आणि अद्ययावत आवृत्ती प्रदान करण्यासाठी, प्राप्तिकर विधेयकाची नवीन आवृत्ती सोमवारी सभागृहाच्या विचारार्थ सादर केली जाईल, असे सूत्रांनी प्रसार माध्यमांना यावेळी सांगितले आहे.

नेमक्या या नव्या बिलावर ३१ सदस्यांच्या निवड समितीने विधेयकावर काही सूचना केल्या होत्या. त्यांनी नवीन कायद्यात धार्मिक-सह-धर्मादाय ट्रस्टना दिलेल्या अनामिक देणग्यांवर कर सवलत सु रू ठेवण्यास अनुकूलता दर्शविली तसेच करदात्यांना आयटीआर दाखल करण्याच्या अंतिम तारखेनंतरही कोणताही दंडात्मक शुल्क न भरता टीडीएस परतावा मागण्याची परवानगी द्यावी असे सुचवले आहे.

# नागपूरमधून धावणार तिसरी वंदे भारत एक्सप्रेस

## रविवारी पंतप्रधान मोदी दाखवणार हिरवा झेंडा

**नागपूर (प्रतिनिधी)–** अजनी (नागपूर) ते पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा शुभारंभ येत्या १० ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने होणार आहे. याच दिवशी बेळगाव- बंगळुरु आणि अमृतसर ते श्रीमाता वैष्णौदेवी कटारा या दोन मार्गांवर देखील वंदे भारत एक्स्प्रेसचा शुभारंभ होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी कर्नाटकमधून तीन वंदे भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवतील.

नागपूर मधून सुटणारी ही तिसरी वंदे भारत एक्स्प्रेस असेल. यापूर्वी नागपूर ते विलासपूर आणि नागपूर ते सिकंदराबाद या मार्गांवर वंदे भारत एक्स्प्रेस सुरु आहेत. आता नागपूरमधील अजनी ते पुणे अशी वंदे भारत एक्स्प्रेस सुरु होणार आहे. रेल्वे मंत्रालयाने नागपूर - पुणे वंदे भारत एक्सप्रेस या गाडीचे अधिकृत वेळापत्रक जाहीर केले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे व आ. रोहित पवार यांच्या उपस्थितीत १२ ऑगस्ट रोजी आढावा बैठक

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवारचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे आणि प्रदेश सरचिटणीस आ. रोहित पवार यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत मंगळवार, दि. १२ ऑगस्ट रोजी सर्व फ्रंटलची आढावा बैठक शासकीय विश्रामगृह येथे सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आ. शशिकांत शिंदे यांची निवड झाल्यानंतर पहिल्यांदाच ते नांदेड दौऱ्यावर येत असून त्यांच्या दौर्यानिमित्त ग्रामीण आणि शहर कार्यकारिणीच्यावतीने तयारी सुरू केलेली आहे. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे आणि प्रदेश सरचिटणीस फ्रंटल व सेलचे राज्य समन्वयक आ. रोहितदादा पवार, जिल्हा प्रभारी आ. सुनील भुसार, मराठवाडा समन्वयक माजी मंत्री राजेश टोपे, माजी मंत्री कमलकिशोर कदम,





माजी मंत्री सुर्यकांत पाटील, माजी मंत्री डॉ. माधवराव किन्हाळकर, तसेच नांदेड जिल्ह्याचे निरीक्षक माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर, आशाताई भिसे यांची उपस्थिती असणार आहे.

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे हे दि. ११ ऑगस्ट रोजी रात्री ९.३० वाजता देवगिरी एक्स्प्रेसने नांदेडकडे प्रयाण करतील. दि. १२ ऑगस्ट रोजी सकाळी ८.५० वाजता त्यांचे आगमन होणार आहे. शासकीय विश्रामगृह येथे आगमन झाल्यानंतर सकाळी ११ ते १.३० या दरम्यान नांदेड शहर व नांदेड ग्रामीण जिल्ह्याचा आढावा घेणार आहेत. दुपारी १.३० ते २ हा वेळ राखीव असणार आहे. दुपारी २ ते २.३० यावेळेत पत्रकार परिषद आयोजित केली आहे. दुपारी २.३० वाजता नांदेड येथून परभणीकडे ते प्रयाण करणार आहेत.

नांदेड येथे आयोजित केलेल्या आढावा बैठकीत प्रदेशाध्यक्ष प्रत्येक पदाधिकाऱ्यांच्या गाठीभेटी घेऊन संघटनात्मक बाबीवर चर्चा करणार आहेत. तेव्हा प्रत्येक तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष व सर्व फ्रंटल सेलच्या अध्यक्षांनी उपस्थित राहण्याचे आवाहन नांदेड जिल्हाध्यक्ष भगवानराव पाटील आलेगावकर तसेच नांदेड शहरातील सर्व फ्रंटलच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन शहर जिल्हाध्यक्ष डॉ. सुनील कदम यांनी केले आहे, अशी माहिती प्रसिद्धी पत्रकात जिल्हा सरचिटणीस प्रा. डी.बी. जांभरूणकर, सरचिटणीस गणेश तादलापूरकर यांनी दिली.

# माजी खा. किरीट सोमय्या यांनी बोगस जन्म प्रमाणपत्र संदर्भात घेतला आढावा

**नांदेड (प्रतिनिधी)–** भाजपचे नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट रोजी अर्धापूर येथे सापडलेल्या बोगस जन्म प्रमाणपत्राच्या प्रकरणी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन माहिती घेतली.

माजी खासदार किरीट सोमय्या हे शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट रोजी नांदेड जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर त्यांनी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांची भेट घेतली. अर्धापूर येथे ८४ बोगस जन्म प्रमाणपत्र सापडल्याने




त्या प्रकरणात संबंधिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात तपासात पुढे काय निष्पन्न झाले, किंवा आरोपी अटक झाले का? या संदर्भाचा आढावा घेण्यासाठी किरीट सोमय्या आले होते.

यावेळी त्यांनी भाजपचे माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले यांच्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. यावेळी भाजपच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले, त्यानंतर मुंबईकडे रवाना झाले.




# जिल्ह्याची शांतता भंग करणाऱ्या १३ जणांची जिल्ह्यातून सहा महिन्यांसाठी हकालपट्टी

## पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्हाभरातील वेगवेगळ्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत सातत्याने गुन्हेगारी करून दहशत पसरविणाऱ्या १३ जणांना सहा महिन्यांसाठी नांदेड जिल्ह्यातून हद्दपार केले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी केली.

जिल्ह्यातील गुन्हेगारांवर वारंवार प्रतिबंधात्मक कारवाई करून सुध्दा त्यांच्या वर्तणात सुधारणा होत नसल्याने अशा गुन्हेगांराना कारागृहात स्थानबध्द तसेच हद्दपार करण्यासंबंधाने पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे ऑपरेशन फ्लश आऊट नुसार कारवाई चालू आहे.

पोलीस ठाणे नांदेड ग्रामीण, वजिराबाद, नायगाव व बिलोली यांच्याकडून कलम ५५ महाराष्ट्र पोलीस अधिनियमान्वये वर नमुद आरोपींना हद्दपार करण्यासंबंधाने प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यामध्ये पोलीस अधीक्षक यांनी कायदेशीर चौकशीची प्रक्रिया पुर्ण करुन नमुद ५ टोळीतील १३ जणांना नांदेड जिल्ह्याचे बाहेर सहा महिन्यांकरीता हद्दपार केले आहे, तसे अंतिम आदेश पारीत करण्यात आले आहेत.

चालु वर्षात कलम ५५ मपोका अंतर्गत ९ टोळ्यामधील २७ जणांना नांदेड जिल्ह्याच्या बाहेर हद्दपार केले आहे. तसेच सन २०२४ मध्ये २७ टोळ्यामधील ८४ जणांना नांदेड जिल्हयाच्या बाहेर हद्दपार करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील धोकादायक व्यक्तींना स्थानबध्द करण्यासंबंधाने चालू वर्षात २२ प्रस्ताव प्राप्त झाले असून १९ व्यक्तींना एमपीडीएकायद्याअंतर्गत एक वर्षासाठी कारागृहात स्थानबध्द केले आहे. सन २०२४ या वर्षात २६ प्रस्ताव प्राप्त झाले होते त्यापैकी १३ व्यक्तींना एमपीडीएकायद्याअंतर्गत एक वर्षासाठी कारागृहात स्थानबध्द केलेले आहे.

### हद्दपार केलेले हे आहेत आरोपी

दिपक ऊर्फ गोगलु सुहास गोडबोले (वय २४ वर्ष, रा. बळीरामपुर ता. जि. नांदेड), सुमेध ऊर्फ बाळा राजु वाघमारे (वय १८ वर्ष, रा. बळीरामपुर ता. जि. नांदेड), विशाल रमेश शितळे (वय २३ वर्ष, रा. एन डी ४१ विजयनगर सिडको, नांदेड), गोविंद इश्वर वट्टमवार (वय २१ वर्ष, रा. एन डी ४१ विजयनगर सिडको, नांदेड), हिरावंत रामचंद्र उपाध्य (वय ५१ वर्ष, रा. रमाईनगर देगलुर जि नांदेड), प्रकाश तुकाराम वाघमारे (वय ३४ वर्ष, रा. मुकुंदनगर, देगलुर), बालाजी ऊर्फ बल्ली गोविंद कोडगीरे (वय ३४ वर्ष, रा. देगावरोड देगलुर), दुर्गा मोहन हातवळणे (वय २८ वर्ष, रा. रमाईनगर देगलुर जि. नांदेड), एकनाथ मोहनराव शिंदे (वय ५२ वर्ष, रा. मांजरम ता. नायगाव जि नांदेड), अमोल एकनाथ शिंदे (वय २४ वर्ष, रा. मांजरम ता. नायगाव जि नांदेड), दिलीप अशोक कांबळे (वय २९ वर्ष, रा. अजनी ता. बिलोली), अविनाश बाबु भरांडे (वय २८ वर्ष, रा. अजनी ता. बिलोली जि. नांदेड) आणि शुभम यशवंत कांबळे (वय २० वर्ष, रा. हसनाळ (पदे) ता. मुखेड जि. नांदेड).

# आज राज्यातील २६ जिल्ह्यांना येलो अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** मागील तीन ते चार दिवसांपासून राज्यातील विविध भागांत पावसाची शक्यता वर्तवण्यात येत आहे. काही भागांत हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. तर काही भागांत अजूनही नागरिकांना उन्हाचे चटके सोसावे लागत आहेत. आज दि. ९ ऑगस्ट रोजीही राज्यातील पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात वादळी पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. राज्यातील २६ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर आणि धाराशिव या सर्व जिल्ह्यांत विजांच्या कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता आहे. या ६ जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यासह मुंबईत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. मुंबईसह पालघर, ठाणे, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांत ढगांच्या गडगडाटासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# रक्षाबंधन नव्हे तर सुरक्षाबंधन

रक्षाबंधन भाऊ आणि बहिणीच्या नात्यातील पवित्रतेचा, प्रेमाचा आणि रक्षणाच्या वचनाचा सण. बाजारपेठा रंगीबेरंगी राख्यांनी सजल्या आहेत, भावंडांचे हृदय प्रेमाने ओथंबले आहे. पण या सणाचा खरा अर्थ आपण विसरत तर नाही ना? राखी बांधताना प्रत्येक भाऊ आपल्या बहिणीच्या रक्षणाचे वचन देतो. मात्र, त्या बहिणीला समाजात खरंच सुरक्षितता मिळते आहे का? हिंदू परंपरेनुसार, रक्षाबंधनाच्या दिवशी बहीण आपल्या भावाच्या आरोग्याची आणि समृद्धीची प्रार्थना करते, तर भाऊ तिच्या सुरक्षिततेचे वचन देतो. हे नाते केवळ रक्ताचे नसून संस्कृतीचेही आहे. द्रौपदीने श्रीकृष्णाच्या जखमेवर वस्त्र फाडून बांधलेला टोक, रक्षणाच्या भावनेचा आदर्श ठरतो. राखी हा केवळ धागा नसून विश्वासाचा, आदराचा आणि जबाबदारीचे प्रतीक आहे. सांस्कृतिक स्तरावर आपण स्त्रीला 'पूजनीय' मानतो. यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः असा धर्मशास्त्राचा सिद्धांत आहे. पण वास्तवात काय चित्र आहे? आजच्या समाजात एका वर्षाच्या बालिकांपासून ९० वर्षांच्या वृद्ध महिलांपर्यंत कोणीही सुरक्षित नाही. एका बाजूला आपण बहिणीच्या रक्षणासाठी राखी बांधतो, तर दुसरीकडे त्या भावाच्याच वयाचा किंवा वडीलधाऱ्या पुरुषाच्या हातून समाजातील इतर स्त्रियांवर अत्याचार होतो. हा विरोधाभास का? कारण संस्कृतीचा अभ्यास फक्त शाळेतील पुस्तकी ज्ञानापुरता मर्यादित राहिला आहे. लहानपणी सारे भारतीय माझे बांधव आहेत ही प्रतिज्ञा म्हणणारी पिढी आज इतर महिलांकडे भगिनीच्या नजरेने पाहते का? आज स्त्री अत्याचाराचे प्रमाण भयानक वाढले आहे. समाजातील नैतिकता आणि संवेदनशीलता दोन्ही कमी होत चालल्या आहेत. केवळ कायद्यावर किंवा शासनाच्या योजनेवर स्त्रीसुरक्षेचे ओझे टाकून चालणार नाही. दर महिन्याला मिळणारे १५०० रुपये स्त्रीच्या आयुष्यातील सगळ्या अडचणी दूर करू शकतात का? स्त्रीला गरज आहे ती आर्थिक सहाय्याइतकीच, किंबहुना त्याहीपेक्षा अधिक, सुरक्षिततेची. आपण शिवाजी महाराजांना देव मानतो, त्यांच्या प्रत्येक जयघोषात आपण गर्वाने छाती फुलवतो. पण त्यांच्या चरित्रातील स्त्रीसन्मान हे मूल्य आपण आत्मसात करतो का? छत्रपती शिवाजी महाराजांनी रांझे पाटलासारख्या नराधमाचा चौरंगा करून समाजाला संदेश दिला होता की, स्वराज्यातील स्त्रीच्या सन्मानाशी खेळ करणाऱ्याला क्षमा नाही. त्यांच्या स्वराज्यात स्त्रियांकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणाची हिंमत नव्हती. आज त्यांची आठवण फक्त सोशल मीडियावर साजरी होते, कृती मात्र कुठेच दिसत नाही. रक्षाबंधन साजरं करताना प्रत्येक भावाने विचार करायला हवा की, मी माझ्या बहिणीचं रक्षण करतोय, पण समाजातील इतर स्त्रियांबद्दल माझा दृष्टिकोन काय आहे? फक्त आपल्या बहिणीला सुरक्षित ठेवून समाज सुरक्षित होत नाही. समाजातील प्रत्येक स्त्रीला बहीण मानल्यावरच रक्षणाचे खरे वचन पूर्ण होईल. आज गरज आहे ती कठोर कायद्यांची. रांझे पाटलाला दिलेली शिक्षा ही आदर्श होती. त्यामध्ये अत्याचार करणाऱ्याला माफी नाही. महाराष्ट्रातही अशा कठोर कायद्यांची आणि त्यांची प्रामाणिक अंमलबजावणी करण्याची नितांत गरज आहे. कारण जेव्हा गुन्हेगाराला भीती वाटेल की, या देशात स्त्रीच्या सन्मानाशी खेळणाऱ्याला क्षमा नाही, तेव्हाच स्त्रीसुरक्षा खऱ्या अर्थाने साध्य होईल. कायद्यासोबतच समाजातील सर्वच लोकांनी जागरूक राहणे गरजेचे आहे. आपल्या भोवताली काय चाललं आहे हे बारकाईने बघून स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय करणाऱ्याला रस्त्यावरच त्याच ठिकाणी धडा शिकविला पाहिजे, पण असे होत नाही. बऱ्याच जणांना वाटते की, मला काय करायचे. यामुळेच मूळ हिंदूंची संस्कृती नष्ट होते चालली आहे. म्हणून सर्वांना हे समजले पाहिजे की, आपल्या सणांची खरी उर्मी केवळ उत्सवात नाही, तर त्यामागील मूल्यांमध्ये आहे. रक्षाबंधन फक्त फुलं, मिठाई, राखी आणि वचन एवढाच मर्यादित नसावा. तो कर्तव्य बनायला हवा. ज्या दिवशी देशातील प्रत्येक मनगट बहिणीच्या रक्षणासाठी सज्ज होईल, त्या दिवशी रक्षाबंधन खऱ्या अर्थाने साजरा झाला असे मानायला हरकत नाही.

# क्रांतीची ज्वलंत मशाल : ऑगस्ट क्रांती दिन



ऑगस्ट क्रांतीने स्वातंत्र्याचा मंगल क्षण समीप आणला. जगाच्या इतिहासावर विलक्षण ठसा उमटवणाऱ्या बोलशेविक क्रांती तसेच अमेरिकन स्वातंत्र्यलढा आणि फ्रेंच राज्यक्रांती या घटनांप्रमाणेच ऑगस्ट क्रांतीलाही अन्यन्य साधारण महत्त्व आहे. आज ऑगस्ट क्रांती दिवस त्यास ८२ वर्षे होत आहेत त्या निमित्ताने...

महात्मा गांधीजींनी छोडो भारतची गर्जना आणि दिलेला करेंगे या मरेंगे हा मंत्र ९ ऑगस्टच्या दिवशी संपूर्ण देशात पसरला होता. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राण्यांची आहुती दिली त्यांना आठवण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट, अर्थात क्रांती दिन!

स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवत देशातून इंग्रजी राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम क्रांतिवीरांना अभिवादन करण्याचा हा दिवस, पण स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यात दंग असलेल्या आजच्या पिढीसाठी हा दिवस 'अनोळखी' झाला आहे. सर्वांच्या हृदयात क्रांतिवीरांची ती मशाल आठवणीच्या रूपाने धगधगत राहणे अपेक्षित आहे. दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना देशातून हुसकावून लावण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतीची ठिणगी पडली होती. क्रिप्स योजनेनंतर राष्ट्रीय सभेने स्वातंत्र्यासाठी प्रखर चळवळ करण्याचा निर्धार केला. वर्धा येथे १४ जुलै १९४२ रोजी राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने भारतातील ब्रिटिश सत्ता ताबडतोब संपुष्टात आणून भारताला स्वातंत्र्य देण्याची मागणी करणारा ठराव मंजूर संमत केला. ७ ऑगस्ट १९४२ रोजी मुंबईच्या गवालिया टँक मैदानावर (क्रांती मैदान) राष्ट्रीय सभेचे अधिवेशन सुरू झाले. या अधिवेशनाचे अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद हे होते. ब्रिटिशांनी भारत सोडून जावे या राष्ट्रीय सभेच्या कार्यकारिणीने वर्धा येथे मंजूर केलेल्या ठरावावर मुंबई येथील अधिवेशनात शिक्कामोर्तब होणार होते.

८ ऑगस्ट रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंनी मांडलेला हा छोडो भारत ठराव प्रचंड बहुमताने मंजूर झाला. गांधींच्या नेतृत्वाखाली देशव्यापी अहिंसक आंदोलन सुरू करण्याचाही निर्णय घेण्यात आला. गांधीजींनी जनतेला करेंगे या मरेंगे या भावनेने बलिदानाला सिद्ध होण्याची स्फूर्तीदायक आवाहन केले. परंतु मध्यरात्रीच महात्मा गांधीजींसह पंडित नेहरू व अन्य प्रमुख नेत्यांना अटक झाली. तरीसुद्धा नेता नसतानाही लोकांनी उस्फुर्तपणे या लढ्यात भाग घेतला. यावेळी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाची आठवण होते.

सामुदायिक चळवळ न करता एकएका व्यक्तीने कायदेभंग करावा असा निर्णय घेण्यात आला, यालाच वैयक्तिक सत्याग्रह असे म्हणतात. आचार्य विनोबा भावे हे वैयक्तिक सत्याग्रहाचे पहिले सत्याग्रही होते. महाराष्ट्रातील सातारा, भोर, आष्टी, आवली, महाड, गारगोटी इत्यादी अनेक गावांतून आबाल वृद्धांनी नेटाने आणि असीम धैर्याने दिलेले लढे अविस्मरणीय ठरले. नंदुरबार येथे शाळेतील विद्यार्थ्यांनी शिरीषकुमार यांच्या नेतृत्वाखाली तिरंगी झेंडा घेऊन मिरवणूक काढली. वंदे मातरमच्या घोषणा दिल्या. पोलिसांनी छोट्या मुलावर गोळीबार केला. या गोळीबारात शिरीष कुमार, लालदास धनसुख लाल, शशिधर घनश्याम हे शाळकरी विद्यार्थी हुतात्मे झाले.

१९४२ च्या अखेरीस जन-आंदोलनाला नवे वळण मिळाले. आंदोलनाचे नेतृत्व तरुण समाजवादी कार्यकर्त्याकडे आले. त्यामध्ये जयप्रकाश नारायण, डॉ. राम मनोहर लोहिया, छोटूभाई पुराणिक, अच्युतराव पटवर्धन, अरुणा असफ अली, विश्वात मेहरअली, सुचिता कृपलानी, एस. एम. जोशी, शिरुभाऊ लिमये, नागोरे, संतोष चव्हाण, यशवंतराव चव्हाण वसंतदादा पाटील, लाल बागडी, उषा मेहता यासारखे अनेक नेते आघाडीवर होते. रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्या-मधील भाई कोतवाल यांचा आझाद दस्ता, नागपूरच्या जनरल आवारे यांची लाल सेना मुंबईला विठ्ठल जवेरी, उषा मेहता व त्यांच्या साथीदारांनी गुप्त प्रक्षेपण केंद्र स्थापन केले. त्याला आझाद रेडीओ म्हणत. देशाच्या काही भागात ब्रिटिश अधिकाऱ्यांची हकालपट्टी करून तिथे लोकाभिमुख सरकार स्थापन केले. याला प्रतिसरकार (Parallel Govt.) असे म्हणतात. महाराष्ट्र, सातारा जिल्ह्यात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी १९४२ साली ब्रिटिश शासन संपुष्टात आणून प्रतिसरकार स्थापन केले. याचे अनुकरण भारतातील इतर राज्याने केले. कुंडल येथील क्रांती अग्रणी जी. डी. उर्फ बापू लाड यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या तुफान सेनेच्या माध्यमातून स्त्रियांचे संरक्षण, गावगुंड आणि सावकारशाही यांचा बंदोबस्त करणे, जातीय सलोखा राखणे, अंधश्रद्धा निर्मूलन करणे, कर गोळा करणे, कायदा व सुव्यवस्था टिकवणे यासारखी कामे प्रतिसरकार मार्फत केली जात. साने गुरुजी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज इत्यादींच्या राष्ट्रभक्तीपर गीतांनी आंदोलकांचा उत्साह वाढवला. या आधुनिक भारताच्या इतिहासात ऑगस्ट क्रांती दिनास विशेष महत्त्व आहे. ऑगस्ट क्रांती ही वसाहत वादाविरोधी, वर्णवाद विरोधी आणि भांडवली शाही विरोधी क्रांती होती. भारतीय राष्ट्रवादास स्फूर्ती आणि प्रेरणा देण्याची सामर्थ्य आपणास ऑगस्ट क्रांतीमध्ये दिसून येते. ज्या दिवशी आपल्या हाती कोणतीही शस्त्रे नसताना महात्मा गांधी यांनी चले जाव, भारत छोडो अशा घोषणा केल्या आणि सबंध भारतातून इंग्रज विरोधात असंतोषाची लाट निर्माण झाली. ज्यांच्या साम्राज्याचा सूर्य कधीही मावळत नव्हता अशा इंग्रजी सत्तेला भारतीय जन आंदोलनातून जो जबरदस्त हादरा देण्यात आला त्याला जगाच्या इतिहासात तोड नाही. चलेजाव चळवळीचे मूल्यमापन करताना दयानंद विद्यापीठतील इतिहासाचे अभ्यासक डॉ. मलिक म्हणतात की, चलेजाव चळवळीने अभूतपूर्व क्रांती केली. इंग्रजांना आपण हिंदुस्थानातून काढता पाय घेतला पाहिजे याची खात्री पटली. आणि भारताच्या स्वातंत्र्यास पोषक वातावरण तयार झाले. या चळवळीस तात्काळ फुलश्रुती मिळाली नसली तरीही नंतर मिळालेल्या स्वातंत्र्याचा मार्ग सुकर झाला. आज आधुनिक भारताच्या विकासासाठी भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, दहशतवाद पर्यावरणाचा ऱ्हास इत्यादींपासून आपण मुक्त होण्याची गरज आहे. इंग्रजांना तर आपण हाकलून दिले. पण आता आपल्या व्यवस्थेत असलेली दोष आपण दूर केली पाहिजेत. जेणेकरून शोषणमुक्त कृषी, औद्योगिक समाज आपण विकसित करू शकतो. स्वातंत्र्याचे स्वराज्य, सुराज्य आणि रामराज्यात रूपांतर करू शकणे हीच ऑगस्ट क्रांतीमध्ये बलिदान केलेल्या हुतात्म्यासाठी खरे अभिवादन ठरेल. शेवटी स्वातंत्र्याच्या या रणसंग्रामात आपल्या प्राणांची आहुती दिलेल्या सर्व नरविराना कवी श्रेष्ठ कवी कुसुमाग्रजांच्या या शब्दांमध्ये विनम्र अभिवादन ...!

कशास आई, भिजविसी डोळे, उजळ तुझे भाल! रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उषःकाल!! सरणावरती आज अमुची पेटता प्रेते! उठतील त्या ज्वालांतून क्रांतीचे नेते !!

**-डॉ. संतोष बाबरे**
सावळज
मो. ९३७१४९६९१०

# बहीण भावाच्या पवित्र नात्याचा सण ; राखी पौर्णिमा

आज ९ ऑगस्ट, संपूर्ण देशात आजचा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करण्यासाठी ज्यांनी प्राणाची आहुती दिली त्या हुतात्म्यांचा स्मरण करण्याचा दिवस म्हणजे ९ ऑगस्ट अर्थात क्रांती दिन ! स्वातंत्र्यलढ्याची मशाल पेटवत देशातून इंग्रज राजवटीला नेस्तनाबूत करण्याची हाक देणाऱ्या तमाम ज्ञात अज्ञात क्रांतिवीरांना अभिवादन करण्याचा हा दिवस. इंग्रजांनी भारताला स्वातंत्र्य करण्याचा दिलेला शब्द न पाळल्यामुळे या आंदोलनाची सुरुवात झाली.

८ ऑगस्ट १९४२ रोजी भारताला स्वातंत्र्य देणार असल्याची घोषणा इंग्रज सरकारने केली होती मात्र ऐनवेळी भारताला स्वातंत्र्य देणार नसल्याचे इंग्रजांनी सांगितले. त्यामुळे महात्मा गांधींनी देशभर ऑगस्ट क्रांती आंदोलनाची घोषणा केली. या आंदोलनाला चले जाओ आंदोलन असेही नाव देण्यात आले. करो या मरो अशी घोषणा या आंदोलनात करण्यात आली. दीडशे वर्षे भारतावर राज्य करणाऱ्या इंग्रजांना देशातून हुसकावून लावण्यासाठी ९ ऑगस्ट १९४२ रोजी क्रांतीची ठिणगी पडली



होती. ९ ऑगस्ट रोजी महात्मा गांधींसह अनेक ज्येष्ठ नेत्यांना इंग्रजांनी अटक केली होती त्यामुळे संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट पसरली होती. महात्मा गांधींच्या झालेल्या अटकेला विरोध करण्यासाठी संपूर्ण देश एकवटला होता. इंग्रजांनी नेत्यांची धरपकड केल्याने आंदोलन लोकांच्या ताब्यात गेले.

देशभर जागोजागी हरताळ, मिरवणुका, मोर्चे यांना ऊत आला. सरकारने लोकांना एकत्र येण्यास बंदी घातली पण लोक सरकारचे आदेश मानायला तयार नव्हते. आंदोलक पोलिसांच्या लाठीहल्ल्याला, गोळीबाराला जुमानत नव्हते. जाळपोळ, पोलिसांचे खून, टेलिफोन व तारा कापणे असे प्रकार सुरू झाले.

जणू लोकांनी ब्रिटिश सत्तेविरूद्ध युद्ध पुकारले होते. संपूर्ण देश पेटला होता. दंगल, जाळपोळ, गोळीबार, रेल्वेचे अपघात, सरकारी कार्यालयांना आगी लावणे, सरकारी खजिन्यांची लुटालूट असे प्रकार सुरू होते. इंग्रजांच्या दडपशाही विरुद्ध संपूर्ण देश एकवटला होता. देशवसियांच्या एकजुटीने इंग्रजांना गुडघे टेकायला लावले होते. दुसऱ्या महायुद्धाने खिळखिळ्या झालेल्या ब्रिटिश सरकारची या आंदोलनामुळे उरली सुरली ताकदही लोप पावत चालली होती. त्यानंतर देशवासीयांनी इंग्रजांना भारतातून हाकलून लावे पर्यंत हे आंदोलन सुरूच ठेवले.

भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. स्वातंत्र्य मिळाल्यापासून या आंदोलनात बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून हा दिवस ऑगस्ट क्रांती दिन म्हणून साजरा केला जातो. मुंबईतील ज्या मैदानावर तिरंगा फडकावून या आंदोलनाची सुरुवत करण्यात आली त्या मैदानाला क्रांती मैदान असे नाव देण्यात आले आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात १८५७ नंतरचा हा सर्वात मोठा स्वातंत्र्य लढा होता म्हणूनच या लढ्याला भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात खूप महत्वाचे स्थान आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# यशाची फळे चाखायची असतील तर संघर्ष करावाच लागतो!

असे म्हणतात की, अपयशाचे कडू डोस पिल्याशिवाय किंवा पिऊन ते पचवल्याशिवाय यश नावाची आपल्याला सहज हवी हवीशी गोष्ट प्राप्त होत नाही.. प्रत्येकाला यश पाहिजे असते पण त्यासाठी करावा लागणारा संघर्ष किंवा प्रयत्न करण्याची कुणाचीच तयारी असत नाही..अर्थात यालाही काही बोटावर मोजण्याइतके अपवाद असतील, पण जेव्हा आपण आपला इतिहास पाहतो, तेव्हा आपल्या लक्षात येते, की ज्याने कुणी यश प्राप्त केले आहे, त्याला संघर्षाच्या काटेरी मार्गावरून जाऊनच, यश नावाच्या गुलाबाचा सुगंध घेता आला. अर्थातच संघर्ष कुणालाच टाळता आलेला नाही.

स्वातंत्र्य पूर्वीचा भारत व स्वातंत्र्यलढ्यात आपल्या प्राणाची आहुती देणारे सर्व भारत मातेचे पुत्र, वीर बलिदानी, यांनी इंग्रजांना भारताच्या बाहेर हाकलून लावण्यासाठी, पराकोटीचा विविध प्रकारचा संघर्ष केला, त्यांनी इंग्रजा विरोधात दीडशे वर्ष संघर्ष करून, लढा देऊन, आपल्याला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करून हे स्वातंत्र्य नावाचे फळ चाखायला दिले.. अर्थातच यशाची फळे चाखायचे असतील, तर माणूस नावाच्या झाडाला ऊन, वारा आणि पाऊस यांच्याशी संघर्ष करावाच लागतो...

छत्रपती शिवरायांना सुद्धा हिंदवी स्वराज्य निर्माण करण्यासाठी मुघलांसोबत लढा द्यावा लागला, कठोर संघर्ष करावा लागला.. त्यांनी अखंड संघर्षाच्या, प्रयत्नाच्या, संयमाच्या आणि जिद्दीच्या जोरावर, शून्यातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले व आपल्यापुढे संघर्षाचे अप्रतिम उदाहरण ठेवले आहे..

देरे हरी पलंगावरी या उक्तीनुसार, जाग्यावर बसून कुणालाही काही मिळालेले नाही व मिळत सुद्धा नाही. जमिनीमध्ये जेव्हा आपण बीज पेरतो, तेव्हा त्यातून उगवून येणाऱ्या रोपट्याला सुद्धा ऊन, वारा आणि पाऊस यांच्यासोबत संघर्ष करूनच आपले अस्तित्व निर्माण करावे लागते.. अर्थातच संघर्षाचा शिवधनुष्य ज्याने ज्याने लीलया पेलला आहे, त्याला त्याला यशाचा मार्ग गवसला आहे. खरे पाहता यशाचा मार्ग हा 'काटेरी मार्ग असतो व वाटेतील काट्यांशी संघर्ष करूनच, कुणालाही आपल्या अस्तित्वाचा किनारा गाठता येतो..

असे म्हणतात की,
अगर इरादे बुलंद हो,
तो रास्ते मिलते है,
अगर इरादे कच्चे
हो, तो बहाने निकलते है

वरील ओळींना समर्पक दाखला म्हणून, कुठल्यातरी राजाने त्याच्या लढाईत पराभूत होण्याचे कारण असे सांगितले होते, की त्याच्या एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात ढाल असल्यामुळे, तो त्याच्या समोरील शत्रूसोबत लढू शकला नाही व त्याचा पराभव झाला.. आपणाला असे निरर्थक कारण देऊन चालणार नाही...जगण्याच्या लढाईत आपणाला केवळ कारणांच्या कुबड्यांचा आधार घेऊन ही लढाई आपण जिंकू शकणार नाही, तर संघर्षाच्या हातात हात देऊन, आपल्याला बिकट परिस्थितीशी दोन हात करता यायला हवे, तरच आपल्याला आपले ठरवलेले निश्चित यश नक्कीच मिळेल...

आजचा काळ आणि त्याची जटीलता पाहता मनात यश प्राप्तीच्या केवळ इच्छांचे बीज पेरून, यशाचे पीक उगवणार नाही, तर अतिशय प्रतिकूल परिस्थितीवर, तितक्याच ताकदीने प्रयत्न रुपी संघर्षाचा मारा करून, किंबहुना यश प्राप्तीच्या अवघड किनाऱ्याला, प्रयत्नांच्या खडकावर धडका मारूनच आपली यश मिळवण्याची शक्यता गडद होऊ शकते...बाकी संघर्ष कुणालाच टळला नव्हता, टळत नाही व टळणार सुद्धा नाही हे मात्र नक्की...
चला संघर्षाच्या गावाला जाऊ,

संघर्षाने आपले अस्तित्व
निर्माण करु, चला आपल्या
स्वप्नांना मूर्त रूप देऊ..
चला संघर्ष करून तर पाहू...

**-प्रा. अमित शिंदे.**
मु. पो. रोहीपिंपळगाव.
ता. मुदखेड, जि. नांदेड.
मो. ९७६७८५१०४६..

# युवापिढी ऑनलाईन जुगाराच्या विळख्यात



सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग आहे आणि या तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईल ही जीवनावश्यक गरज बनली आहे. आजची तरुण पिढी मोबाईलच्या इतकी आहारी गेली आहे की या तरुणांना मोबाईलचे व्यसनच जडले आहे. आज प्रत्येक तरुणाकडे स्मार्टफोन आहे. या स्मार्टफोनमध्ये इंटरनेटवर चालणारे अनेक प्रकारचे गेम असतात. या गेमने तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. कॅण्डी क्रश, ब्ल्यू व्हेल, अँग्री बर्ड, पोकोमेन, पब्जी असे ऑनलाइन गेम इंटरनेटवर धुमाकूळ घालत आहेत. ऑनलाइन रमी गेम हा देखील त्यापैकीच एक गेम. या ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात तरुणाई अडकली आहे.

ऑनलाइन रमी गेम खेळण्याचे वेड तरुण पिढीला आर्थिक नुकसान करणारे ठरत आहे. मोबाईलवर खेळला जाणारा हा गेम म्हणजे एकप्रकारचा जुगाराच आहे. हातात असलेल्या मोबाईलवर ऑनलाइन रमी खेळण्याचे अनेक एप्लिकेशन उपलब्ध आहेत. घरी, शेतात, नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेकजण एकत्र येऊन ऑनलाइन रमी खेळताना दिसत आहे. ऑनलाइन रमी हा एकप्रकारचा जुगार असून या जुगारात तरुण पिढी पुरती अडकली असून त्यांना त्यातून बाहेर काढण्याऐवजी चित्रपट तारे आणि क्रिकेट खेळणारे खेळाडू या ऑनलाइन रमी गेमची टीव्हीवर जाहिरात करून तरुण पिढीला जुगारच्या गर्तेत ढकलत आहे.

चित्रपट तारे असोत की क्रिकेटपटू हे तरुणांचे आयडॉल असतात. त्यांच्या सर्व गोष्टींचे तरुण मुले अनुकरण करत असतात म्हणूनच ऑनलाइन रमी चालवणाऱ्या कंपन्या या सिलिब्रेटींना करोडो रुपये देऊन आपली जाहिरात करायला लावतात मात्र या सिलिब्रेटींनी आपण पैशासाठी तरुण पिढीला कोणत्या मार्गावर नेत आहोत याचा विचार करावा. केवळ पैसे कमावणे हा सिलिब्रेटींचा उद्देश नसावा सामाजिक दायित्व देखील तितकेच महत्वाचे आहे. चित्रपट तारे आणि क्रिकेटर यांनी सामाजिक जबाबदारीचे भान ठेवून ऑनलाइन रमीच्या जाहिराती बंद कराव्यात. ऑनलाइन जुगारच्या विळख्यात अडकल्याने तरुणांना मोठ्या आर्थिक नुकसानिस सामोरे जावे लागत आहे. ऑनलाइन रमी गेमच्या नादाला लागून अनेकजण कंगाल झाले आहेत. ऑनलाइन रमी गेममुळे अनेक कुटुंबे उध्वस्त होत आहेत. ऑनलाइन रमी गेमच्या विळख्यात अडकल्याने अनेक कुटुंबे बेघर झाले आहेत. ऑनलाइन रमी खेळून अनेक तरुण कर्जबाजारी झाली आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी पालकांनी आपली घरे व शेती विकली आहे. सहज पैसे कमवण्याचे आमिष दाखवून लोकांच्या घामाची कमाई लुटली जात आहे. ऑनलाइन रमी खेळताना पैसे हरल्याने तरुणांमध्ये नैराश्य येत आहे. यातून काही तरुणांनी आत्महत्या देखील केल्या आहेत. या गेममुळे हिंसाचार देखील वाढला आहे. दक्षिणेकडच्या राज्यांनी

ऑनलाइन गेमवर बंदी घातली आहे. कर्नाटक सरकारने तसा कायदाच केला आहे. केरळ, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यातही ऑनलाइन रमीवर बंदी आहे. पुरोगामी महाराष्ट्रात मात्र अजूनही ऑनलाइन रमीवर बंदी नाही. नुकत्याच झालेल्या पावसाळी अधिवेशनात देखील हा प्रश्न चर्चेत आला होता मात्र न्यायालयाने ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिल्याचे सरकारतर्फे सांगण्यात आले. न्यायालयाने जरी ऑनलाइन रमीवर बंदी घालण्यास नकार दिला असला तरी महाराष्ट्र सरकारने अध्यादेश काढून तसा कायदा करावा. सरकारकडे प्रचंड बहुमत आहे शिवाय विरोधी पक्ष देखील या अध्यादेशाला पाठिंबाच देतील त्यामुळे अध्यादेश काढून ऑनलाइन रमीवर बंदी घालण्याचा कायदा महाराष्ट्र सरकारला करता येऊ शकतो. राज्यातील तरुणांना ऑनलाइन रमी या जुगारातून वाचवायचे असेल आणि तरुणांना ऑनलाइन जुगारच्या विळख्यातून सोडवायचे असेल तर महाराष्ट्र सरकारने ऑनलाइन रमीवर बंदी घालणारा कायदा करायलाच हवा.

**-श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

## थोडक्यात...

### जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालत

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी ऑगस्ट महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी १२ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### सराईत गुन्हेगार चिंग्या तरटेची हर्सुल कारागृहात रवानगी

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहर व जिल्ह्यात परिसरात सतत गुन्हे करून दहशत पसरवणाऱ्या सराईत गुन्हेगार संतोष ऊर्फ चिंग्या तरटे याची एमपीडीएअंतर्गत छत्रपती संभाजीनगर येथील हर्सुल कारागृहात रवानगी केली आहे.

सराईत गुन्हेगार संतोष ऊर्फ चिंग्या साईनाथ तरटे (वय २४ वर्षे रा. खोब्रागडे नगर, नांदेड) याच्याविरुध्द खून, खूनाचा प्रयत्न, अग्नीशस्त्र ताब्यात बाळगणे, खंडणी वसूल करणे, शस्त्र ताब्यात बाळगणे, करणे असे गंभिर स्वरुपाचे गुन्हे दाखल असल्याने शिवाजीनगर पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांनी वरिल गुन्हेगारास एमपीडीए अधिनियमाप्रमाणे स्थानबध्द करणे बाबतचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी राहुल कर्डिले यांनी सदर प्रस्तावातील गुन्हेगारास एक वर्षाकरीता मध्यवर्ती कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्सुल कारागृहात रवानगी केली आहे.

# विशेष सहाय्य योजनेत ८१ लाभार्थ्यांचे केले डीबीटी



**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड तालुक्यातील विशेष अर्थसहाय्य योजनेतील डिबीटी न झालेल्या लाभार्थ्यांचे डीबिटी, आधार अपडेट, अनुदान वाटपाचे ईकेवायसी करून घेण्यासाठी मंडळ अधिकारी तरोडा बुद्रुक व वसरणी मंडळ अधिकारी कार्यालयात महसूल सप्ताहात विशेष कॅम्प घेण्यात आले.

दि. १ ते ७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत महसूल सप्ताह आयोजित करण्यात आला होता. उपविभागीय अधिकारी नांदेड डॉ. सचिन खल्लाळ व तहसीलदार संजय वारकड यांच्या मार्गदर्शनानुसार विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. विशेष सहाय्य योजनेचे डीबीटी न झालेले लाभार्थी यांना ग्राम महसूल अधिकारी व म हसूल सेवकामार्फत संपर्क साधून लाभार्थी यांचे कॅम्पमध्ये डीबीटी न झालेल्या लाभार्थ्यांचे डीबीटी, आधार अपडेट, अनुदान वाटपाचे ई-केवायसी करूण घेण्यात आली. तसेच शिधापत्रिका धारकांचे ई-केवायसी करुन घेण्यात आले. सदर कॅम्पमध्ये परिविक्षाधिन तहसीलदार अभयराज व नायब तहसीलदार महसूल सुनील माचेवाड यांनी भेटी देवून मार्गदर्शन केले.

कॅम्प यशस्वी करण्यासाठी पोस्ट विभागातील अधिकारी व कर्मचारी तसेच आधार किट सेतू संचालक व महसूल कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. कॅम्प यशस्वी करण्यासाठी मंडळ अधिकारी वाजेगाव व तुप्पा प्रमोद बडवणे, मंडळ अधिकारी तरोडा बु. व वसरणी शिवानंद स्वामी, नांदेड ग्रामिण अनिरुद्ध जोंधळे, शिरिश येवते, कुणाल जगताप, नन्हू कानगुले यांचे सहकार्य लाभले. ग्राम महसूल अधिकारी वसरणी आर. पी.मुंडे, ग्राम महसूल अधिकारी धनेगाव/ मुजामपेठ दीपक सोनटक्के, ग्राम महसूल अधिकारी वांगी दिलीप पवार, ग्राम महसूल अधिकारी वडगाव प्रियंका कापसे, ग्राम महसूल अधिकारी वाजेगाव एम.के.पाटील, असरजन सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी मारूती जमदाडे, कौठा सज्जाचे ग्राम महसूल अधिकारी मारुती श्रीरामे, ग्राम महसूल अधिकारी गोपीनाथ कल्याणकर, शिवाजी तोतरे, दयानंद पाटील, अंकुर सकवान, भास्कर इपर, मोहन कदम, अश्विनी गिरडे, संगोयो विभागाचे महसूल सहायक सुनिता पोरडवार, प्रतिका मुदगुलवार, दिपाली काळे, आरती सारंग, ऑपरेटर संतोष वाघमारे तसेच पोस्ट ऑफिसचे कर्मचारी गोविंद मुळे, बापूसाहेब येलमेकर सिडको टीएसओ, रेणुका वडजे, तेजस्विनी घोडके, संतोष निर्मले, सय्यद राऊफ, सय्यद मेहराज, बालाजी नायके व आधार कार्ड कीटचे संचालक गंगाधर गिरी, ऋषिकेश मेहकर, शेख नदीम हे उपस्थित होते. या कॅम्पमध्ये अपंग, विधवा व वयोवृद्ध नागरिकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता, डीबीटी झालेल्या लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनेचा योजनेचा लाभ मिळणार आहे. या कॅम्पच्या अनुषंगाने लाभार्थ्यांच्या अडचणी सोडविण्यात आल्या.

# महसूल सप्ताहानिमित्त सिध्दनाथ येथे वृक्षारोपण

## उपविभागीय अधिकारी डॉ. खल्लाळ यांची वृध्दाश्रमास भेट



**नांदेड (प्रतिनिधी)–** महसूल सप्ताहानिमित्त शासनाच्या विविध योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी विविध लोकाभिमुख उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. याचाच एक भाग म्हणून शुक्रवारी वाजेगाव महसूल मंडळातील सिद्धनाथ येथील शिवानंद स्वामी संस्थानच्या परिसरात उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी त्यांनी परिसरातील वृध्दाश्रम ास भेट देऊन जेष्ठ नागरिकांशी संवाद साधला .

महसूल सप्ताहानिमित्त १ ऑगस्टपासून महसूल सप्ताह आरंभ झाला असून तहसील कार्यालय नांदेडच्यावतीने गावपातळीवर विविध लोकोपयोगी कार्यक्रम घेण्यात आले. यासप्ताहातशासनाच्याजनकल्याणकारी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात आली आहे. महसूल सप्ताहा निमित्त वृक्षारोपणाचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर घेण्यात आले आहे. नांदेडचे तहसीलदार संजय वारकड, परिविक्षाधीन तहसीलदार अभयराज नानजुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली नायब तहसीलदार सुनील माचेवाड यांच्या सूक्ष्म नियोजनात शुक्रवारी सिध्दनाथ येथील शिवानंद स्वामी संस्थानच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी संस्थानचे सचिव माणिकराव देशमुख यांचेसह नायब तहसीलदार संजय नागमवाड, सुनिल माचेवाड, सरपंच सटवाजी तारू, माजी सरपंच आनंदा आवातिरक, ग्रामपंचायत सदस्य दुर्गाजी पाटील आवातिरक, राजाराम खाडे, तातेराव पाटील, बालाजी दगडफोडे, नामदेव आवातिरक, प्रसेनजीत तारू, पोलीस पाटील सुनिता आवातिरक, आशाताई श्रीमती जयश्री आवातिरक, ग्राम रोजगार सहायक मारोती जाधव, सुरेश कदम यांचेसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी संस्थानचे गुरु श्रीकांत देशमुख लाठकर, त्र्यंबक गुरु महाराज उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाजेगाव मंडळ अधिकारी प्रमोद बडवणे, ग्राममहसूल अधिकारी श्रीमती ललिता नागलगे, दिलीप पवार, एम. के. पाटील, महसूल सेवक संतोषी कर्डिले, श्रद्धा सूर्यवंशी, सेतू चालक एकनाथ ठोके आदींनी योगदान दिले.

## संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह



**लोहा (प्रतिनिधी)–** प्रतिवर्षी प्रमाणे याही वर्षी लोहा शहरातील श्री दत्त संस्थान देऊळगल्ली येथे कैवल्य साम्राज्य चक्रवर्ती, संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जन्मोत्सवानिमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहाचे आयोजन केले असल्याची माहिती श्री दत्त संस्थानकडून देण्यात आली.

सर्वश्री हभप लक्ष्मीकांत महाराज लोहेकर, हभप भालेराव गुरुजी महागावकर, हभप आत्माराम महाराज रायवाडीकर, हभप चंद्रकांत महाराज कनकदंडे यांच्या मार्गदर्शनाखाली मित्ती श्रावण शुद्ध. १५ (पौर्णिमा) रोज शनिवार, दि. ९ ऑगस्ट २०२५ पासून ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणास आरंभ होत आहे. दि. १६ आगस्ट २०२५ रोजी काल्याचे किर्तन हभप गुरुवर्य लक्ष्मीकांत महाराज लोहेकर यांचे होणार आहे. तद्नंतर लगेचच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी या पारायण सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन या सुवर्ण महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन, श्री दत्त संस्थान देऊळगली, लोहा यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दलित वस्ती विकास निधी इतरत्र हलविल्याप्रकरणी चौकशी समिती गठीत

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील महापालिकेच्या हद्दीत इंदिरानगर येथील सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम स्थळ बदलून सुरू असल्याबाबत चौकशी करण्यासाठी समाज कल्याण विभागातील सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी दोन सदस्य समितीची स्थापना केली आहे. या बाबतची तक्रार डॉ. आंबेडकरनगर येथील पंकज कांबळे आणि पौर्णिमानगर येथील दीपक कसबे यांनी सहायक आयुक्त समाज कल्याण कार्यालयास केली होती.

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत नांदेड शहरातील पौर्णिमानगर या दलितवस्ती भागात नागरीकांसाठी महानगरपालिकेच्या मोकळ्या जागेत सांस्कृतिक सभागृहाचे बांधकाम करण्याची परवानगी समाज कल्याण कार्यालयाने जुलै २०२२ मध्ये दिली होती. यानंतर फेबुरवारी २०२४ मध्ये सहाय्यक आयुक्त कार्यालयाने ते स्थळ बदलून दिले. खरे तर हे काम दलित वस्तीतील आहे, तर त्याच भागात होणे आवश्यक आहे. कारण दलित वस्तीतील लोकांना त्या सभागृहाचा उपयोग व्हावा. परंतू समाज कल्याण कार्यालयानेच इंदिरानगरचे नाव टाकून जागा बदलून दिली आहे. जीपीएस लोकेशनप्रम ाणे बांधकाम सुरू असलेली जागा अंबेकरनगर दर्शवत आहे. अंबेकरनगर ही वस्ती पुर्णपणे स्वर्ण व हिंदु वस्ती आहे. इंदिरानगर भागात १५-२० घरे दलित समाजाची आहेत आणि इतर सर्व वेगवेगळ्या जमातीचे लोक आहेत. त्यामुळे जागा बदलून देण्याचे दिलेले आहेत, चुकीचे आहेत ते बदलून द्यावे. प्राप्त झालेल्या माहितीनुसार ते काम १ कोटी ३० लाख रुपयांचे आहे. त्यातील ५५ लाख रुपयांचा निधी कंत्राटदाराला अदा करण्यात आला आहे. दलित वस्तीच्या निधीची ही उधळपट्टी आहे. यासाठी चौकशी समिती स्थापना व्हावी असा या निवेदनाचा आशय आहे. या निवेदनाला अनुसरून समाज कल्याण विभागातील सहायक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी समाज कल्याण विभागातील संतोष चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीत सदस्य या पदावर कैलास राठोड यांना नेमण्यात आले आहे आणि या दोघांना दलितवस्ती योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या निधीचा योग्य विनियोग झाला की, नाही याबाबत चौकशी करून अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## सिद्धेश्वर महादेव मंदिरात शिवलीला पारायण सोहळा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड शहराजवळील वाडी बु. येथील त्रिमुर्ती पार्क रोड विशालनगर येथे असलेल्या सिद्धेश्वर महादेव मंदिरात श्रावण मासानिमित्त शिवलीला अमृत पारायण सोहळ्याचे आयोजन केले आहे. दि. ११ ते १७ ऑगस्ट २०२५ या कालावधीत दररोज सकाळी ८.३० ते १०.३० या वेळेत हा पारायण सोहळा होणार आहे.

ज्या शिवभक्तांना पारायणास बसावयाचे आहे, त्यांनी कावेरी मुदखेड, धोंडिबा कोनाले, यमुना हासगुळे, अंतेश्वर अंबरबंडे यांच्याकडे नावनोंदणी करावी. तसेच या पारायणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सिद्धेश्वर महादेव मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रीय महामार्ग २२२ मालेगावच्या दुभाजकावर झाडे लावण्याची मागणी

**मालेगाव (प्रतिनिधी)–** राष्ट्रीय महामार्ग २२२ मालेगाव या महामार्गावर असलेल्या पूर्वीच्या झाडांच्या बदल्यात कुठेही वृक्ष लागवड झाली नाही. सध्या पावसाळा सुरू असून वृक्ष लागवडीसाठी हा योग्य काळ आहे. या दुभाजकांमध्ये झाडे लावल्यास पर्यावरणाच्या रक्षणाची व महामार्गाचे सौंदर्य वाढण्यास मदत होईल. त्यामुळे या महामार्गावर झाडे लावण्यात यावीत अशी मागणी वृक्ष मित्र परिवारातर्फे करण्यात आली.

मालेगाव ता.अर्धापूर येथील वृक्षमित्र परिवार वृक्ष लागवड व संगोपन याबद्दल वृक्षारोपण, जनजागृती व प्रचार करण्याचे कार्य मागील पाच वर्षांपासून करत आहे. मालेगाव परिसरात आत्तापर्यंत हजारो झाडांचे वृक्षारोपण या परिवाराच्या माध्यमातून झाले आहे. आता प्रशासनाच्यावतीने वृक्षारोपण केले तर रस्ता करण्यापूर्वी झालेली हजारो झाडांची हानी भरून निघेल असे मत वृक्षमित्र परिवाराकडून व्यक्त करण्यात आले.

यावेळी वृक्ष मित्र परिवाराचे ईश्वर पाटील, सुनील मिरजकर, डॉ. जीवन जोशी, अशोक स्वामी, विठ्ठल इंगोले, राजेश पंडित, सुरेश लखे, देवानंद वारले, राजाभाऊ राजेवार उपस्थित होते.

# आयकॉन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल येथे मुख्यमंत्री सहाय्यता निधी योजना कार्यान्वित

## संचालक डॉ. पुरूषोत्तम पवार यांच्या प्रयत्नांना यश

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील वसंतराव नाईक चौक परिसरातील मराठा हॉटेलच्या मागे पटेल कॉलनी येथील डॉ. पुरुषोत्तम पवार यांच्या आयकॉन मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल येथे मुख्यमंत्री सहायता निधी योजना कार्यान्वित करण्यात आली आहे.

या ठिकाणी हाडाचे व मणक्याचे सर्व प्रकारचे ऑपरेशन्स हे महात्मा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत होत असतात व जे ऑपरेशन्स या योजनेत कार्यान्वित होत नाहीत त्यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून अशा रुग्णांचे ऑपरेशन पार पाडता येणार आहेत तरी जास्तीत जास्त गरजू रुग्णांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आयकॉन मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटलचे संचालक डॉ. पुरुषोत्तम पवार यांनी केले आहे.



याविषयी माहीती देताना डॉ. पवार यांनी सांगितले की, सार्वजनिक आरोग्य सेवेला बळकटी देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले असून आयकॉन हॉस्पिटल हे रुग्णालय आता मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी योजनेत अधिकृतरित्या संलग्न झाले आहे.

या योजनेतून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू रुग्णांना अत्यवस्थ स्थितीत वैद्यकीय उपचारासाठी आर्थिक सहाय्य मिळते. यात आयकॉन हॉस्पिटल संलग्न झाल्यामुळे आता या परिसरातील रुग्णांना अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा सुलभ आणि विनामूल्य किंवा सवलतीत मिळू शकतील.

आयकॉन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या मुख्यमंत्री सहायता निधीशी संलग्नतेमुळे गरीब रुग्णांना वेळेत उपचार देणे शक्य होईल व सरकारकडून आर्थिक मदतीसाठी प्रक्रिया अधिक सुलभ होईल असा विश्वास डॉ. पुरूषोत्तम पवार यांनी यावेळी व्यक्त केला आहे.

## लोहा तहसील कार्यालयातील माधव काकडे यांचा उत्कृष्ट महसूल सेवक म्हणून गौरव



**लोहा (प्रतिनिधी)–** लोहा तहसील कार्यालयातील अभ्यंगतांची मदत करणारे माधव काकडे यांना उत्कृष्ट महसूल सेवक म्हणून जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, अतिरिक्त जिल्हाधिकारी पी.एस. बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्या उपस्थितीत प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आहे.

महसूल दिनानिमित्त जिल्ह्यातील उत्कृष्ट काम करणाऱ्या कर्मचारी अधिकारी यांचा प्रशस्तीपत्र देऊन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव केला जातो. यंदाही लोहा तालुक्यातील महसूल कर्मचारी माधव काकडे यांना महसूल दिनानिमित्त उत्कृष्ट महसूल सेवक म्हणून सन्म ानपत्र देऊन गौरविण्यात आले.

त्यांच्या गौरवाबद्दल उपजिल्हाधिकारी अरुणा संगेवार, तहसीलदार परळीकर, तहसीलदार रामेश्वर गोरे, नायब तहसीलदार अशोक मोकले, राजेश पाठक, संदीप हाडग यांनी अभिनंदन केले आहे.

# शाळांच्या शैक्षणिक व भौतीक सुविधेसाठी निधी उपलब्ध करून देण्यासाठी कटीबद्ध -आ. चिखलीकर

**नांदेड (प्रतिनिधी)–** सर्वसामान्य जनतेची मुले शिक्षण घेत असलेल्या जिल्हा परिषदेच्या शाळांना कंधार, लोह्यासाठी माझ्या आमदार निधीतून तर जिल्ह्यातील इतर शाळांसाठी डीपीडीसीसारख्या इतर अनेक योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षणाधिकारी यांनी आवश्यक गरजांची यादी तयार करून सादर करावी. हा निधी उपलब्ध करण्यासाठी मी कटीबद्ध राहीन, अशी ग्वाही शिक्षक संवाद मेळावा व सन्मान कर्तृत्वाचा या कार्यक्रमात बोलताना आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी दिली.

लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघाचे आ. प्रतापराव पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शिक्षक संवाद मेळावा व सन्मान कर्तृत्वाचा हा सोहळा गणराज बँक्केट हॉल नमस्कार चौक, नांदेड येथे छत्रपती शिवाजीराजे प्रतिष्ठान व शिक्षक संघटना पदाधिकारी यांच्यावतीने आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगीआ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांना मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या उपक्रमातर्गत राज्य, विभाग जिल्हा, तालुका स्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आलेल्या शाळांना शाळा विकासासाठी उत्तेजनार्थ बक्षीस दिलेल्या जिल्ह्यातील ५५ शाळांना व विविध स्पर्धा परीक्षेत सर्वोच्च यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना व शाळांना सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूर्व राज्य शिक्षण संचालक डॉ. गोविंद नांदेडे तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे से.नि.उपमुख्यकार्यकरी अधिकारी शिवाजीराव कपाळे, नेताजी भोसले, अखिल महाराष्ट्र संघटनेचे नेते देवीदासराव बस्वदे, छत्रपती शिवाजीराजे प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा शिक्षक संघाचे नेते जीवनराव वडजे, जिल्हा शिक्षण सहकारी पतपेढीचे चेअरमन दत्ता पाटील भोसले, फारूख बेग उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. गोविंद नांदेडे, शिक्षणाधिकारी श्रीमती वंदना फुटाणे यांनी शिक्षक संवाद मेळाव्यात गुणवंत विद्यार्थी व पुरस्कार प्राप्त शाळांचा सन्मान करून त्यांच्या पाठीवर आम च्या हातून शाबासकीची थाप दिल्याबद्दल आयोजकांचे धन्यवाद व्यक्त करीत आ. चिखलीकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आयोजक पतसंस्थेचे माजी चेअरमन अशोक पाटील मारतळेकर यांनी प्रास्तविक तर संचलन व्याख्याते रमेश पवार यांनी तर आभार प्रदर्शन जे.डी. कदम यांनी केले. उपरोक्त कार्यक्रमास फारूख बेग,बाबुराव कैलासे, सौ.राजश्री देशमुख, सौ. जाधव ालासाहेब लोने, जे.डी. कदम, चंद्रकात मेकाले, चंद्रकात कुणके, उद्धव सूर्यवंशी, दिलीप देवकांबळे, जयवंत काळे, नरसिंग सोनटक्के, माणिक कदम, संजय अंबुरे, ज्ञानेश्वर फसमले, हणमंत जोगपेटे, सुधाकर थडके, पी.डी. पोले, शेख समदाणी अशोक मोरे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सुहास मुळे, डी. एस.धात्रक, मंगल सोनकांबळे, भगवान चव्हाण, भगवान गजभारे, जी. टी. कदम, सुभाष पाईकराव, बळीराम फाजगे, जनक गादगे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## शिवसेना-युवासेना वरळी मुंबई शाखेच्यावतीने आ. आनंद बोंढारकर यांचा वाढदिवस साजरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचा वाढदिवस मुंबई येथे शिवसेना- युवासेना वरळी शाखेच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. हा वाढदिवस वरळी युवासेना विभाग विधानसभा प्रमुख साईकिरण सेपुरी यांच्या पुढाकारातून पार पडला.



आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांचा वाढदिवस नांदेडमध्ये नुकताच साजरा करण्यात आला. त्यानंतर मुंबईतही त्यांच्या वाढदिवसा निमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मुंबईतील वरळी युवासेना विधानसभाप्रमुख साईकिरण सेपुरी यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या अभिष्टचिंतन सोहळ्यास शिवसेना वरळी विभागप्रमुख दत्ता नरवणकर, शाखाप्रमुख राजेश पांडे, संतोष सावंत, महिला शाखाप्रमुख लक्ष्मीताई शिंदे, शितलताई सावंत यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी आणि युवा सेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या

# जर अचानक कोट्यवधी रुपये तुमच्या बँक खात्यात आले तर...



**उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडा येथील दनकौर येथे एका मृत महिलेच्या खात्यात कोट्यवधी रुपये आल्याचा अचानक मेसेज आला. अशा अनेक घटनांनी यापूर्वीही बातम्यांमध्ये स्थान मिळवले आहे. आता कल्पना करा की एके दिवशी तुम्ही झोपेतून उठता आणि तुम्हाला कळते की तुमच्या खात्यातही कोट्यवधी रुपये जमा झाले आहेत, तर तुम्ही काय कराल? तुम्ही उठून खरेदी करायला जाल की पैसे दुसऱ्या खात्यात ट्रान्सफर कराल? जर तुम्ही असे काही करण्याचा विचार करत असाल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की तुम्ही या दोन गोष्टी अजिबात करू नयेत. असे केल्याने तुम्ही कायदेशीर अडचणीत येऊ शकता आणि तुरुंगवासदेखील होऊ शकतो.**

## प्रत्येक व्यवहाराची असते नोंद

आम्ही आधी सांगितल्याप्रमाणे, जर अचानक कोट्यवधी रुपये खात्यात आले तर तुम्हाला ते खर्च करण्याची किंवा कुठेही ट्रान्सफर करण्याची गरज नाही. खरं तर, डिजिटल व्यवहारांच्या युगात, प्रत्येक व्यवहाराची नोंद केली जाते. अशा परिस्थितीत, जर तुम्ही अज्ञात रकमेशी छेडछाड केली तर बँक किंवा तपास संस्था सहजपणे त्याचा मागोवा घेऊ शकतात. अशा परिस्थितीत, जर तुमच्या खात्यात कधी अज्ञात रक्कम जमा झाली, तर तुमच्या बँकेच्या अधिकृत वेबसाइट किंवा मोबाइल ॲपवरील Help/Support मध्ये Dispute/Unauthorized Transaction सेक्शनमध्ये जा आणि तक्रार दाखल करा. तुमच्या तक्रारीत व्यवहार आयडी टाकायला विसरू नका, जेणेकरून बँक व्यवहाराची चौकशी करू शकेल. तुम्हाला हवे असल्यास, तुम्ही थेट बँकेत जाऊन तक्रार देखील करू शकता. तथापि, तुमच्या स्पष्टीकरणासाठी बँकेला अधिकृत ईमेल पाठवणे चांगले.

## आरबीआयच्या पोर्टलवर तक्रार करा

जर तुम्हाला अज्ञात रकमेची चौकशी करताना कायदेशीर अडचणीत पडायचे नसेल, तर आरबीआयच्या अधिकृत वेबसाइट https://cms.rbi.org.in वर जा आणि File a Complaint वर क्लिक करा आणि तुमची तक्रार नोंदवा. तक्रार दाखल केल्यानंतर, तुम्हाला एक तक्रार संदर्भ क्रमांक मिळेल, जो तुम्ही सुरक्षितपणे ठेवावा. भविष्यात तुम्ही त्या अज्ञात रकमेची चौकशी करणाऱ्या एजन्सीला तुमचा हेतू दाखवण्यासाठी त्याचा वापर करू शकता. जेणेकरून तुम्ही सुरक्षित असाल.

## तुमचे सर्व बँकिंग आणि UPI पासवर्ड बदला

अनेकदा तुमचे खाते हॅकिंग किंवा चुकून फंड ट्रान्सफर यासारख्या घटनांमध्ये लक्ष्य बनू शकते. अशा परिस्थितीत, जर खात्यात अज्ञात रक्कम आली तर तुमच्या सर्व बँकिंग ॲप्स, नेट बँकिंग आणि UPI चे पासवर्ड बदला. याशिवाय, या सर्व सेवांसाठी टू फॅक्टर ऑथेंटिकेशन चालू करा. असे केल्याने, जर तुमचे कोणतेही खाते हॅक करण्याचा प्रयत्न झाला तर ते तिथेच थांबेल.

**जर तुम्हाला तुमच्या खात्यावर कोणत्याही सायबर हल्ल्याचा किंवा हॅकिंगचा धोका वाटत असेल तर तुम्ही https://cybercrime.gov.in वर तक्रार करू शकता. यासाठी, तुम्ही वेबसाइटवर जाऊन Report Other Cyber Crime सेक्शनमध्ये तुमची तक्रार नोंदवू शकता. जर तुम्हाला वाटत असेल की हा घोटाळा आहे किंवा तुमची माहिती चोरीला गेली आहे, तर ऑनलाइन फॉर्मद्वारे FIR किंवा NCR देखील करता येते.**

## मृत व्यक्तीचे खाते बंद करा

बँकेत अज्ञात रकमेचे ताजे प्रकरण एका मृत महिलेशी संबंधित होते. अशा परिस्थितीत, एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याचे बँक खाते बंद करणे महत्वाचे आहे. खाती आणि UPI बंद केले पाहिजेत. जर असे केले नाही तर, मृत खात्यांचा वापर फसवणूक किंवा हवालासारख्या गंभीर गुन्ह्यांसाठी केला जाऊ शकतो. भविष्यात कायदेशीर आणि सायबर सुरक्षेचे धोके टाळण्यासाठी, एखाद्या व्यक्तीचा मृत्यू होताच, अधिकृत प्रक्रियेनुसार त्याचे बँक आणि UPI खाते बंद केले पाहिजेत.

# इन्स्टाग्रामने केली X आणि TikTok ची कॉपी!

## गुगलसारखे मॅप फीचर देखील आले...

**इन्स्टाग्रामने दोन नवीन फीचर्स सादर केले आहेत. आता लोकांना एलोन मस्कच्या X प्लॅटफॉर्मची सुविधा इंस्टाग्राममध्येही मिळेल. हो, आता इंस्टाग्रामवर रीपोस्ट करण्याचा पर्याय देखील उपलब्ध आहे. याशिवाय, कंपनीने आणखी काही फीचर्स सादर केले आहेत. यामध्ये लोकेशन शेअरिंग मॅप आणि नवीन फ्रेंड्स टॅबचा समावेश आहे. या सर्व फीचर्सबद्दल इंस्टाग्रामच्या ब्लॉग पोस्टमध्ये सांगितले गेले आहे. आता वापरकर्ते त्यांच्या आवडत्या पब्लिक रील्स आणि पोस्ट पुन्हा पोस्ट करू शकतात. याशिवाय, आता तुम्ही इंस्टाग्राम मॅप वापरून तुमच्या निवडक मित्रांसह तुमचे लोकेशन शेअर करू शकता. चला फीचर्सबद्दल सविस्तर जाणून घेऊया...**



इंस्टाग्रामच्या नवीन फीचर्सकडे पाहून असे दिसते की ते टिकटॉक आणि एक्सची कॉपी करत आहे. तथापि, ॲपची हे फीचर्स वापरकर्त्यांसाठी खूप उपयुक्त ठरू शकतात. रिपोस्ट फीचरच्या मदतीने, तुम्ही तुमच्या फॉलोअर्ससह कोणतेही रील्स किंवा पोस्ट पुन्हा पोस्ट करू शकता. आम्ही तुम्हाला सांगतो की पुन्हा पोस्ट केलेल्या पोस्ट एका वेगळ्या टॅबमध्ये दिसतील. इंस्टाग्राम प्रोफाइल उघडल्यानंतर जसे तुम्हाला रील इत्यादींचा विभाग दिसतो, तसेच तुम्हाला तेथे पुन्हा पोस्ट करण्याचा विभाग दिसेल. येथे तुम्हाला तुमच्याद्वारे पुन्हा पोस्ट केलेल्या अनेक पोस्ट दिसतील. याचा निर्मात्यांनाही खूप फायदा होईल. जर कोणी त्यांचे रील आणि पोस्ट पुन्हा पोस्ट केले तर ते अधिक लोकांपर्यंत पोहोचेल.

- पुन्हा पोस्ट करणे खूप सोपे : इंस्टाग्रामचे हे वैशिष्ट्य वापरणे खूप सोपे आहे. यासाठी, तुम्हाला ते कोणत्याही सार्वजनिक पोस्ट किंवा रीलवर मिळेल. तुम्हाला हा पर्याय लाईक, कमेंट आणि शेअर आयकॉनजवळ मिळेल. त्यावर क्लिक करून, तुम्ही पोस्ट पुन्हा पोस्ट करू शकता. यासह, पोस्ट पुन्हा पोस्ट करताना तुम्ही एक टीप देखील जोडू शकता.
- इंस्टाग्राम मॅपद्वारे तुमच्या मित्रांशी कनेक्ट व्हा : तुम्ही इंस्टाग्राम मॅपद्वारे तुमच्या मित्रांशी अपडेट राहू शकता. तुम्ही तुमचे शेवटचे सक्रिय स्थान शेअर करू शकता. तुमच्या सोयीनुसार ते कधीही बंद केले जाऊ शकते. तुम्ही नकाशा उघडून तुमच्या मित्रांनी आणि आवडत्या निर्मात्यांनी मनोरंजक किंवा मजेदार ठिकाणांहून पोस्ट केलेली सामग्री देखील पाहू शकता. स्थान शेअरिंग डीफॉल्टनुसार बंद असेल. तुम्ही तुमचे स्थान कोणासोबत शेअर करायचे ते निवडू शकता. तुमच्याकडे विशिष्ट ठिकाण किंवा व्यक्तीसोबत स्थान शेअर न करण्याचा पर्याय देखील आहे.
- फ्रेंड टॅबदेखील मजेदार : रील्समध्ये 'फ्रेंड' हा एक नवीन टॅब देखील जोडला गेला आहे. येथे तुम्ही तुमच्या मित्रांनी संवाद साधलेल्या सार्वजनिक सामग्रीच्या सूचना किंवा तुम्ही सुरू केलेल्या ब्लेंड्स पाहू शकता. तसेच, तुम्ही त्यांच्याबद्दल सहजपणे संभाषण सुरू करू शकता. 'फ्रेंड' हे तुमचे प्रियजन कोणते रील्स बनवत आहेत हे पाहण्यास मदत करेल. कंपनीच्या ब्लॉग पोस्टनुसार, 'फ्रेंड' या वर्षाच्या सुरुवातीला सुरू झाले होते आणि आता ते जागतिक स्तरावर लाँच केले गेले आहे.

# UPI मधून कापले गेले, पण समोर पैसे मिळालेच नाहीत?




**तुमच्यासोबत कधीतरी असे घडले असेल की UPI द्वारे एखाद्याला पेमेंट करूनही, दुसऱ्या व्यक्तीला पेमेंट मिळाले नाही. जर हो, आणि तुम्हाला अशा परिस्थितीत नेमके काय करावे हे माहीत नसेल, तर आम्ही तुम्हाला सांगतो की तुम्ही काय करायला हवे. खरं तर, UPI बराच काळ प्रचलित असूनही, तांत्रिक कारणांमुळे डिजिटल पेमेंट अडकल्यास काय करावे हे लोकांना कळत नाही.**

- ॲपमध्ये पेमेंट स्थिती तपासा : जेव्हा तुम्ही UPI पेमेंट करता आणि दुसऱ्या व्यक्तीला पैसे मिळत नाहीत, तेव्हा तुम्ही ॲपवर तुमच्या पेमेंटची स्थिती तपासली पाहिजे. जर पेमेंट स्टेटस यशस्वी दिसत असेल तर ३० ते ६० मिनिटे वाट पहावी. ते एका तासाच्या आत समोरच्या व्यक्तीला मिळाले पाहिजे. काही कारणास्तव पेमेंट स्टेटस अयशस्वी झाले, तर काळजी करण्याची गरज नाही. कधीकधी तांत्रिक त्रुटींमुळे पेमेंट मध्येच अडकते. असे पेमेंट तुमच्या खात्यात ताबडतोब किंवा २४ तासांच्या आत परत केले जाते.
- स्टेटस प्रलंबित दिसले तर काय? : जर तुम्हाला पेमेंट ॲपमध्ये तुमच्या पेमेंटचे स्टेटस यशस्वी किंवा अयशस्वी दिसण्याऐवजी प्रलंबित दिसले तर तुम्ही ते स्टेटस बदलण्याची वाट पहावी. प्रत्यक्षात पेमेंट स्टेटस म्हणजे पेमेंट अजूनही प्रक्रियेत आहे आणि अशा परिस्थितीत ते यशस्वी किंवा अयशस्वी काहीही असू शकते. पेमेंटची स्टेटस स्पष्ट झाल्यानंतर, तुम्ही पुढे काय करायचे याचा विचार करू शकता.
- ॲपमध्ये तक्रार करा : जर तुम्हाला किंवा दुसऱ्या व्यक्तीला एका तासापेक्षा जास्त काळानंतर पेमेंट मिळाले नाही, तर तुम्ही त्या ॲपमध्ये तक्रार दाखल करावी. जवळजवळ सर्व ॲप्समध्ये ही तक्रार दाखल करण्याची प्रणाली असते. तक्रार दाखल केल्यानंतर २४ तासांनंतरही ॲपकडून तुम्हाला कोणताही उपाय मिळाला नाही, तर तुम्ही तुमच्या बँकेच्या ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधावा. तेथे तुम्ही तुमच्या ट्रान्झॅक्शन आयडीसह तक्रार दाखल करू शकता. बँकेला पुढील ३० दिवसांत तुमचे पैसे परत करावे लागतील आणि जर बँक तसे करू शकली नाही, तर तुम्ही तुमची तक्रार आरबीआयकडे नेऊ शकता. अशा प्रकरणांमध्ये आरबीआय केवळ संपूर्ण पैसे परत करत नाही तर बँकांवर दंड देखील आकारते.

# चुकूनही गुगलवर सर्च करू नका या ४ गोष्टी

## तुम्हाला तुरुंगात जावे लागू शकते...

**इंटरनेटने माणसाच्या दैनंदिन जीवनात केव्हाच प्रवेश केला आहे. जेव्हा जेव्हा कोणत्याही विषयात काही समजत नाही किंवा माहिती गोळा करावी लागते, तेव्हा लोक सर्वप्रथम गुगलवर सर्च करतात. पण तुम्हाला माहिती आहे का की गुगलवर सर्च करतानाही तुम्ही काळजी घेतली पाहिजे. तुम्ही अयोग्य असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल गुगलवर सर्च करू नये. जर तुम्ही असे केले तर तुमचा आयपी ॲड्रेस ट्रॅक केला जाऊ शकतो आणि गुप्तचर संस्था किंवा पोलीस तुमच्या घरी पोहोचू शकतात. एवढेच नाही तर तुम्हाला तुरुंगातही जावे लागू शकते. गुगलवर सर्च करताना काय टाळावे हे जाणून घेऊया...**




- बॉम्ब बनवण्याची पद्धत शोधू नका : गुगलवर बॉम्ब किंवा शस्त्र बनवण्याची पद्धत कधीही शोधू नका. खरं तर, देशाच्या गुप्तचर संस्था अशा हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवतात. जर तुम्ही बॉम्ब बनवण्याची किंवा स्फोटके तयार करण्याची पद्धत शोधली तर संशयास्पद हालचाली लक्षात घेऊन तुमच्यावर काही कारवाई होण्याची शक्यता आहे. अशा प्रकरणामुळे स्थानिक पोलिस तुम्हाला चौकशीसाठी ताब्यात घेऊ शकतात, जर तुमचा सहभाग कोणत्याही संशयास्पद प्रकरणात आढळला तर तुम्हाला अटक देखील केली जाऊ शकते.
- हॅकिंग शिकण्याशी संबंधित गुगलवर शोधू नका : जर तुम्ही गुगलवर जाऊन डिव्हाइस कसे हॅक करायचे, पासवर्ड हॅक करण्याची पद्धत काय आहे किंवा हॅकिंग टूल्स डाउनलोड करा हे शोधले तर तुम्ही सायबर क्राइम युनिटमध्ये बसलेल्या लोकांच्या नजरेत येऊ शकता. हॅकिंग कायद्याने गुन्हा आहे, म्हणून जर तुम्ही त्याची पद्धत शिकली तर तुम्ही संशयास्पद हालचालीचा भाग आहात आणि पोलीस तुम्हाला चौकशीसाठी घेऊन जाऊ शकतात. जर तुम्ही हॅकिंग केले असेल तर तुम्हाला अटक देखील केली जाऊ शकते.
- गुगलवर पायरेटेड चित्रपट शोधू नका : अनेक वेळा असे घडते की लोक ओटीटी किंवा थिएटरमध्ये जाण्याऐवजी गुगलवर मोफत चित्रपट शोधतात. येथे ते चित्रपटाचे पायरेटेड व्हर्जन पाहण्यासाठी येतात, परंतु असे करणे कायद्याने गुन्हा आहे. जर तुम्ही गुगलवर पायरेटेड चित्रपट डाउनलोड केले किंवा शोधले तर तुम्हाला दंड किंवा तुरुंगवास देखील होऊ शकतो. भारतातील कॉपीराइट कायद्यानुसार पायरसी गुन्ह्याच्या श्रेणीत येते हे आम्ही तुम्हाला सांगतो.
- गुगलवर बाल अश्लील सामग्री शोधू नका : जर तुम्ही गुगलवर बाल अश्लील सामग्री शोधली तर तुम्ही गुन्हा करत आहात. असे करणे जगभरात गुन्हा मानले जाते. जर तुम्ही बाल अश्लील सामग्री शोधली तर तुम्हाला कठोर कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागू शकते. तुमच्यावर POCSO म्हणजेच लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे संरक्षण कायद्याअंतर्गत खटला चालवला जाऊ शकतो. यासाठी दीर्घ तुरुंगवास आणि दंडाची तरतूद आहे. सायबर गुन्हे युनिट अशा सामग्री शोधणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवते. हा एक गंभीर गुन्हा आहे.



# गुगल हॅकर्सच्या निशाण्यावर

## अनेक वापरकर्त्यांचा डेटा चोरीला गेला, जाणून घ्या काय आहे संपूर्ण प्रकरण...

आजकाल डेटा चोरीचे प्रकार दररोज समोर येत आहेत. गुगलने अलीकडेच त्यांच्या एका डेटाबेसमधून काही वापरकर्त्यांची माहिती चोरीला गेल्याची पुष्टी केली आहे. गुगलच्या ब्लॉग पोस्टनुसार, गुगल थ्रेट इंटेलिजेंस ग्रुपने म्हटले आहे की त्यांच्या सेल्सफोर्स डेटाबेस सिस्टमपैकी एकाला शायनीहंटर्स (औपचारिक नाव UNC6040) नावाच्या हॅकिंग गटाने हॅक केले होते. यामुळे, अनेक वापरकर्त्यांची माहिती चोरीला गेली आहे. तुमच्या माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की कंपनीचा हा सेल्सफोर्स डेटाबेस लहान आणि मध्यम आकाराच्या व्यवसायांचे संपर्क तपशील आणि संबंधित नोट्स सेव्ह करण्यासाठी वापरला जातो.

### हॅकर्सनी वापरकर्त्यांची ही माहिती चोरली

डेटाबेसमधून डेटा चोरीची घटना ६ ऑगस्ट २०२५ रोजी घडली. कंपनीचे म्हणणे आहे की हॅकर्सनी चोरलेला बहुतेक डेटा सामान्य माहितीचा होता. यात व्यवसायाचे नाव आणि संपर्क तपशील समाविष्ट आहेत. गुगलने किती वापरकर्त्यांचा डेटा चोरीला गेला आहे हे सांगितले नाही. गुगलचे प्रवक्ते मार्क करयन यांनी ब्लॉग पोस्टमध्ये जास्त काही सांगितले नाही. हॅकर्सनी त्यांच्याकडून डेटा चोरल्यानंतर खंडणी मागितली आहे की नाही हे देखील त्यांनी सांगितले नाही. अशा डेटा चोरीनंतर अनेकदा कंपन्या खंडणी मागतात.

### शायनीहंटर्स हॅकर्स ग्रुप करतो मोठ्या कंपन्यांना लक्ष्य

तुमच्या माहितीसाठी, आम्ही तुम्हाला सांगतो की शायनीहंटर्स हॅकर्स ग्रुप मोठ्या कंपन्यांना आणि त्यांच्या क्लाउड आधारित डेटाबेसना लक्ष्य करण्यासाठी ओळखला जातो. अलीकडेच, सिस्को आणि एअरलाइन कंपनी क्वांटास आणि रिटेल कंपनी पेंडोराचादेखील डेटा चोरीला गेला. याबद्दलची माहिती ब्लीपिंग कॉम्प्युटरकडून मिळाली.

### ते अशा प्रकारे डेटा चोरतात

गुगलने त्यांच्या ब्लॉग पोस्टमध्ये म्हटले आहे की हा गट व्हॉइस फिशिंग तंत्राचा वापर करून डेटा चोरतो. ते त्यांच्या कर्मचाऱ्यांना फसवून कंपनीच्या क्लाउड आधारित सेल्सफोर्स डेटाबेसमध्ये प्रवेश करतात. गुगलने म्हटले आहे की शायनीहंटर्स ग्रुप डेटा लीक साइट तयार करण्याची तयारी करत आहे. काही रॅन्समवेअर टोळ्या चोरीचा डेटा प्रकाशित करण्यासाठी या साइटचा वापर करतात. डेटा चोरी केल्यानंतर कंपन्यांकडून खंडणी मागितली जाते.

# राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करण्यासाठी कार्यवाही करा -मंत्री गोरे

**मुंबई (प्रतिनिधी)**- राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि उपकेंद्रांमध्ये कार्यरत असलेल्या कंत्राटी परिचारिका, एएनएम आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांचा समकक्ष पदांवर समावेश करून त्यांना नियमित करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले. या विषयावर सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या समवेत संयुक्त बैठकीत ते बोलत होते.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कंत्राटी कर्मचारी समायोजनबाबत मंत्रालयात बैठक झाली. यावेळी ग्राम विकास सचिव एकनाथ डवले, सार्वजनिक आरोग्य सचिव विरेंद्र सिंग, आयुक्त (आरोग्य सेवा) डॉ. कादंबरी बलकवडे, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी नमूद केले की, राज्यातील अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य सेवक-सेविका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, औषध निर्माण अधिकारी, कनिष्ठ सहाय्यक आदी पदे रिक्त आहेत. अशा ठिकाणी कंत्राटी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली असून विशेषतः परिचारिका, एएनएम व वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या नियमितीकरणासाठी आवश्यक पावले उचलावीत. सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, ग्राम विकास विभागांतर्गत कार्यरत कंत्राटी वैद्यकीय कर्मचाऱ्यांच्या शासकीय सेवेत समावेशनासाठी सामान्य प्रशासन विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात येईल. किमान १० वर्ष सेवा केलेल्या कर्मचाऱ्यांना प्राधान्य दिले जाईल. रिक्त पदांपैकी ३० टक्के पदे समावेशनासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील पिलीव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत जीर्ण झालेली असून, तिच्या दुरुस्ती व नवीन इमारतीच्या बांधकामासाठी एक कोटी ३९ लाख रुपयांची तरतूद यापूर्वी मंजूर करण्यात आली आहे. मात्र, खर्च वाढल्यामुळे आणखी अडीच कोटी रुपयांचा निधी सार्वजनिक आरोग्य विभागाने उपलब्ध करून द्यावा.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली अमेरिकेच्या वाढीव टॅरिफबाबत उच्चस्तरीय बैठक



**मुंबई (प्रतिनिधी)**- अमेरिकेने वाढवलेल्या टॅरिफचा महाराष्ट्रावर काय परिणाम होऊ शकतो, याचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय बैठक झाली.

या बैठकीस मुख्यमंत्री यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीणसिंह परदेशी, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी.गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, राज्यकर, वस्तू व सेवा कर आयुक्त आशिष शर्मा, उद्योग सचिव डॉ.पी. अन्बळगन, 'मित्रा'चे सहमुख्य कार्यकारी अधिकारी अमन मित्तल तसेच, 'मित्रा'चे अर्थ तज्ज्ञ संजीव सक्सेना, मुंबई स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे प्राध्यापक सत्यनारायण कोठे आणि अर्थतज्ञ ऋषी शाह यांनाही निमंत्रित करण्यात आले होते.

या बैठकीत जीडीपी, रोजगार, वाणिज्य आदी महत्वाच्या मुद्द्यांवर प्राथमिक चर्चा करण्यात आली. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे राज्यातील निर्यातप्रधान उद्योगांवर संभाव्य परिणाम, तसेच जागतिक बाजारातील स्पर्धात्मकतेवर होणारे परिणाम याचा अभ्यास करण्याची गरज असल्याचे मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी सांगितले.

राज्यातील उद्योगांचे हित आणि अर्थव्यवस्था बळकट ठेवण्यासाठी केंद्र सरकारशी तातडीने समन्वय साधून आवश्यक उपाययोजना आखण्यातयेतील. या अनुषंगाने केंद्र सरकारकडून मार्गदर्शन घेण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

राज्यातील उद्योगांचे हित जोपासण्यासाठी आणि अर्थव्यवस्था बळकट ठेवण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# उत्तरकाशीत अडकलेल्या पर्यटकांशी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांचा संवाद

**मुंबई (प्रतिनिधी)**-उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात झालेल्या भीषण भूस्खलन आणि पूरस्थितीमुळे तिथे अडकलेल्या १७१ पर्यटकांशी संपर्क झाला असून ते सर्व सुरक्षित ठिकाणी आहेत. उर्वरीत एक पर्यटक श्रीमती कृतिका जैन यांच्याशीही संपर्क साधण्याचे प्रयत्न युध्दपातळीवर सुरु असल्याची माहिती जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आणि संबंधित यंत्रणेने दिली आहे.

महाराष्ट्रातील विविध भागांतील सर्व पर्यटक प्रवासी सुखरूप आहेत. राज्याचे आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन हे उत्तराखंडमध्ये काल दाखल झाले असून त्यांनी विविध ठिकाणी अडकलेल्या पर्यटकांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधून शासनाकडून करण्यात येत असलेल्या उपायोजनाची माहिती दिली. तसेच परिसरातील रस्ते देखील पुर्ववत सुरू करून त्याद्वारे नागरिकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय रस्ते विकास विभाग राज्यमंत्री अजय टम्टा यांची देखील मंत्री श्री. महाजन यांनी भेट घेऊन याबाबत त्यांच्याशी संवाद साधला आहे. राज्य शासनाकडून महाराष्ट्रातील पर्यटकांसाठी सर्व आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत असल्याचे आपत्ती व्यवस्थापन मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.

उत्तराखंड राज्यातील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली परिसरात एकूण १७२ पर्यटकांपैकी १४७ पर्यटक (६७ मातली, ६ जॉली ग्रॅन्ट तसेच ७४ उत्तरकाशी) येथे सुखरुप आहेत. सुरक्षित असलेल्या पर्यटकांनी त्याच्या नियोजित कार्यक्रमानुसार पुढील वाटचाल सुरु केली आहे. २४ पर्यटक हर्षील येथे सुरक्षित असुन त्यांना एअर लिफ्ट करुन खढइझ उरा चिरींरश्रळ येथे हलविण्यात येणार आहे.

राज्य आपत्ती नियंत्रण कक्ष, महाराष्ट्र हे डएजउ उत्तराखंड, जिल्हा नियंत्रण कक्ष, उएजउ उत्तरकाशी, आणि राष्ट्रीय आपत्कालीन प्रतिसाद केंद्र (छएठउ) नवी दिल्ली यांच्याशी सातत्याने संपर्कात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे या मदत कार्याच्या परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.आपत्ती व्यवस्थापन व जलसंपदा मंत्री गिरीश महाजन उत्तराखंड येथे घटनास्थळी शोध व बचावकार्यासाठी दिशानिर्देश देत असून पर्यटकांना सुखरूप स्थळी पोहचविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. व स्थानिक प्रशासनाच्या समन्वयाने त्यासंबंधी उपाययोजना राज्य शासनाकडून राबवल्या जात आहेत. संचालक (आपत्ती व्यवस्थापन) उत्तराखंड यांचेकडून संचालक (आपत्ती व्यवस्थापन) मंत्रालय, मुंबई यांना प्राप्त झालेल्या अहवालानुसार बचाव कार्यासाठी उपाययोजना केली जाणार आहे.

२४ पर्यटक हर्षील येथे सुरक्षित असुन त्यांना एअर लिफ्ट करुन हलविण्यात येणार आहे. गंगोत्री ते हर्षील हेलीपॅड यांचे दरम्यान यात्रेकरुंच्या सुरक्षिततेसाठी १० आयटीबीपी टीम तैनात करण्यात आल्या आहेत. प्रत्येक टीम ३० यात्रेकरूंना संरक्षण देणार आहे. लष्कर, छउठऋ, डउठऋ आणि स्थानिक बचाव पथक धराली येथे कार्यरत आहेत. संपर्क यंत्रणा व रस्ते अद्याप पूर्ववत झालेले नाहीत. संपर्क व रस्ते पायाभूत सुविधा पूर्ववत करण्यासाठी सर्व प्रयत्न सुरू आहेत. छएठउ नियंत्रण कक्षाच्या अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार हवाई बचाव कार्य सुरू झाले असून त्यांचे स्थलांतर अपेक्षित आहे.

# बांधकाम व्यावसायिकांना राज्य ग्राहक आयोगाचा दणका

**पुणे (प्रतिनिधी)**- इमारतींचा अंतिम पूर्णत्वाचा दाखला (कम्प्लिशन सर्टिफिकेट) आणि मालमत्तेचे अभिहस्तांतर (कन्व्हेयन्स डीड) करून देण्यास बांधकाम व्यावसायिक टाळाटाळ करीत असल्याने वैतागलेल्या सोसायटीधारकांना राज्य ग्राहक आयोगाच्या पुणे खंडपीठाने दिलासा दिला आहे. बांधकाम व्यावसायिकाने सहा आठवड्यांच्या आत इमारतींचे बांधकाम पूर्ण झाल्याचा दाखला आणि मालमत्ता हस्तांतराचे प्रमाणपत्र सोसायटीकडे सादर करावे; तसेच अपुरी ग्राहक सेवा दिल्याबद्दल दोन लाख रुपये भरपाई आणि तक्रार खर्चापोटी १५ हजार रुपये सोसायटीला द्यावेत, असा आदेश आयोगाने दिला आहे.

पुणे खंडपीठाचे सदस्य मिलिंद सोनवणे आणि नागेश कुंबरे यांनी हा महत्त्वाचा निकाल दिला. महाराष्ट्र सदनिकांचा मालकीहक्क कायद्यानुसार (मोफा) बांधकाम व्यावसायिकाने इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्याचा दाखला आणि मालमत्तेचे अभिहस्तांतर करून देणे बंधनकारक आहे. ही कायदेशीर जबाबदारी पार पाडण्यास टाळाटाळ करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांना या निकालाने चाप बसला आहे. याबाबत आंबेगाव तालुक्यातील मोराडीवाडी येथील 'सान्वी रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण सोसायटी'चे अध्यक्ष प्रकाश सुतार, खजिनदार संतोष ढवळे यांच्यासह १६ सदनिकाधारकांनी 'सान्वी कन्स्ट्रक्शन' प्रोप्रायटरी व तिचे संचालक मारुती बागल यांच्याविरोधात राज्य ग्राहक आयोगाकडे दाद मागितली. तक्रारदारांच्या वतीने ड. लक्ष्मण जाधव यांनी बाजू मांडली. संबंधित कंपनीच्या गृहप्रकल्पाच्या 'बी' विंग इमारतीत तक्रारदारांच्या सदनिका आहेत.

# जमीन विक्रीवरून वाद,आईचा खून करून मुलाची आत्महत्या

**लातुर (प्रतिनिधी)**- लातूरमधील रेणापूर तालुक्यातील सांगवी येथे जमीन विक्रीच्या वादातून मुलाने वयोवृद्ध आईचा खून (डर्रीी उीळाश छशुी) करून स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

सुमिंद्रबाई जाधव (वय ७०) यांच्या नावे असलेली शेती विकावी, असा आग्रह त्यांचा मुलगा काकासाहेब जाधव (वय ४८) मागील काही दिवसांपासून धरत होता. मात्र आईने ठाम नकार दिल्याने रागाच्या भरात काकासाहेब यांनी ७ ऑगस्ट रोजी शेतातच आईचा तोंड दाबून आणि गळा आवळून खून केला. त्यानंतर मृतदेह उसाच्या शेतात पुरून टाकला.

सदर घटनेची माहिती मिळताच रेणापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. पोलिसांचा तपास सुरू झाला. आई आणि मुलांमध्ये शेतजमीन विकण्यावरून वाद असल्याची माहिती मिळाली. मुलगा काका साहेबाचा शोध सुरू झाला. मात्र काकासाहेबांचा तपास लागला नाही. रेणापूर शिवारात एका झाडाला लटकलेल्या अवस्थेत काकासाहेब जाधव यांचा मृतदेह आढळून आला.

# सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियासाठी वीर परिवार सहायता योजना

**नांदेड (प्रतिनिधी)**- सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि यांच्या कुटुंबियांसाठी वीर परिवार सहायता योजनेच्या अंमलबजावणीसाठी नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात कायदेशीर सेवा केंद्र स्थापन केले आहे. लाभार्थ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे येऊन अर्ज सादर करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी केले आहे.

सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि यांच्या कुटुंबियांना नॅशनल लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी मार्फत वीर परिवार सहायता योजना-२०२५ मोफत आणि सक्षम कायदेशीर सेवाप्रदान करीत आहे. या योजनेचा उद्देश देशाचे संरक्षण करणारे सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना प्रभावित करणाऱ्या वैयक्तिक आणि नागरी हक्काच्या कायदेशीरबाबींमध्ये सेवा प्रदान करणे आहे.

ही योजना सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि यांच्या कुटुंबियांना मालमत्ता आणि कौटुंबिक वाद, वारसा हक्काचे आणि वारसाचे प्रश्न, आर्थिक फसवणुकीचे प्रकरणे, कल्याणकारी योजनेखालील लाभ मिळवणे, दिव्यांग अधिकार नियम २०१६ अंतर्गत हक्क मिळवून देण्यासारख्या विविध कायदेशीर बाबीमध्ये मदत पुरवते.या योजनेत डिजिटल सुविधांचा वापर करण्यात आला आहे. जसे छरश्रीर च्या लीगल सर्विसेस मॅनेजमेंट सिस्टम पोर्टलद्वारे ई-फायलिंग, ई-कोन्सिलिंग, ई-मेडीएशन आणि ई-लोक अदालत या उपाय योजनेमुळे दुर्गम भागातही न्याय मिळवणे सोपे होईल. ही योजना केवळ एक कल्याणकारी उपाय नाही तर देशाच्या संरक्षणासाठी निस्वार्थ सेवा करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी कृती आहे. या योजनेमुळे देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानाच्या कुटुंबियांना त्यांच्या अनुपस्थित ही विश्वसनीय कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध होईल.


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे


डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.

संपर्क गोपालअण्णा

डॉग डिलर

मोबाईल नंबर

९८५०६८८५२८




## टी.सी.हरवली

माझी शैलिता किशन कांबळे या नावाची इयत्ता १२ वी पासची टीसी डोणगांव ते नरसी बसने प्रवास करत असताना हरवली आहे.तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावे.

**:संपर्क:**
**शैलिता किशन कांबळे**
**रा.अंजनी ता.बिलोली.**
**जिल्हा नांदेड**
**मो.९८३४६८२४२३**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की खालील प्लॉट धारक यांनी सहकारी ज्ञानेश्वर गृहनिर्मान संस्था गावठाण , वाडी बुद्रुक तालुका जिल्हा नांदेड. व ग्रामपंचायत कार्यालय वाडी बुद्रुक यांच्याकडे खालील सर्व प्लॉट धारकांनी कागदपत्राद्वारे व शपथपत्राद्वारे लिहून दिले आहे व ते त्या प्लॉटवर कब्जेदार आहेत. त्यांनी सोसायटी व ग्रामपंचायतला पत्राद्वारे नमूना नं ८ साठी विनंती केली आहे.

तरी या प्लॉट विषयी कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसाच्या आत ग्रामपंचायतला कागदपत्राद्वारे लेखी आक्षेप नोंदवावा.

सात दिवसानंतर ग्रामपंचायतला कोणाचाही आक्षेप आला नाही तर खालील सर्व प्लॉट धारकांना नमुना नंबर आठ देण्यात येईल.

खालील प्लॉट धारकांची नावे...

| | |
|---|---|
| १. नारायण उत्तम थोरात | ३०*४०=१२०० चौरस फुट |
| २. गिरधारी उत्तम थोरात | ३०*४०=१२०० चौरस फुट |
| ३. अनिता विनोद वाघमारे. | २५*३०=७५० चौरस फुट |
| ४. राहुल श्रीरंग वाघमारे. | ३०*३०=९०० चौरस फुट |
| ५. आम्रपाली राष्ट्रपाल शेळके. | ३०*४०=१२०० चौरस फुट |
| ६. राहुल बाबुराव गच्चे. | ३०*५०=१५०० चौरस फुट |
| ७. पंकज सुभाष भोकरे. | २०*५०=१००० चौरस फुट |
| ८. लक्ष्मण नारायण कोकणे. | ३०*५०=१५०० चौरस फुट |

**स्वाक्षरी**
**ग्रामपंचायत कार्यालय वाडी बुद्रुक.ता.जि.नांदेड**
**सहकारी ज्ञानेश्वर गृहनिर्मान संस्था गावठाण , वाडी बुद्रुक ता.जि. नांदेड.**

# महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेसाठी ३१ ऑगस्ट पर्यंत ऑनलाईन प्रवेशिकेची मुदत

**मुंबई (प्रतिनिधी)**- शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ३ नोव्हेंबर, २०२५ पासून सुरु होणाऱ्या हौशी मराठी, हिंदी, संगीत व संस्कृत राज्य नाट्य स्पर्धांसाठी तसेच बालनाट्य स्पर्धा व दिव्यांग बालनाट्य स्पर्धांसाठी नाट्य संस्थांकडून १ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने प्रवेशिका मागविण्यात येत असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य संचालक विभीषण चवरे यांनी दिली. सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार व सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य नाट्य स्पर्धा पार पडणार असल्याचे श्री.चवरे यांनी नमूद केले आहे.

२२ व्या महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेची प्राथमिक फेरी डिसेंबर, २०२५ पासून विविध १० केंद्रांवर तर ६४ व्या हौशी हिंदी, संगीत व संस्कृत नाट्य स्पर्धेची अंतिमफेरी प्रत्येकी एका केंद्रावर डिसेंबर, २०२५ पासून आयोजित करण्यात येणार आहे.

नोंदणीकृत हौशी नाट्य संस्थांना तसेच गतवर्षी राज्यनाट्य स्पर्धेत सहभागी झालेल्या नाट्य संस्थांना स्पर्धेसाठी विहित नमुन्यातील प्रवेशिका, नियम संचालनालयाच्या https://hanatyaspardha.com या वेबसाईटवर ऑनलाईन उपलब्ध होतील. आवश्यक त्या कागदपत्रासह प्रवेशिका ३१ ऑगस्ट, २०२५ पर्यंत ऑनलाईन सादर कराव्यात.

विहित मुदतीनंतर कोणत्याही परिस्थितीत प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. प्रवेशिकेसोबत आवश्यक असणारी कागदपत्रे जोडलेली नसल्यास किंवा संपूर्ण तपशिल भरला नसल्यास ऑनलाईन प्रवेशिका भरता येणार नाही.

स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाल्यानंतर संस्थेने शासनाने निश्चित केलेल्या केंद्रावर व दिलेल्या तारखेस प्रयोग सादर केला नाही, तर त्यांची प्रवेशिकेसोबत भरलेली अनामत रक्कम शासकीय कोषागारात जमा करण्यात येईल. नाट्यस्पर्धेकरीता संस्थांना शासन नियम बंधनकारक राहतील. नियमांचे उल्लंघन केल्यास संस्थेला अपात्र ठरविण्यात येईल.

राज्यातील जास्तीत जास्त नाट्य संस्थांनी महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत आपला सहभाग नोंदवावा असे आवाहन श्री. चवरे यांनी केले आहे.

## Change In Name

My old name is PATHAN JUNID which now I am changing as new name: PATHAN JUNID AMINSAB Hence forth my all correspondence will be done as per my new name please consider the same Add:H.N.1000 NEAR SHIVAJI HIGH SCHOOL AT POST SANKHED TQ LOHA DIST NANDED MAHARASHTRA 431708 MO.9673457814

## टी.सी.हरवली

माझी शिला किशन कांबळे या नावाची इयत्ता १२ वी पासची टीसी डोणगांव ते नरसी बसने प्रवास करत असताना हरवली आहे तरी कोणास सापडल्यास खालील पत्यावर संपर्क साधावे.

**:संपर्क:**
**शिला किशन कांबळे**
**रा.अंजनी ता.बिलोली.**
**जिल्हा नांदेड**
**मो.९८३४६८२४२३**

## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचित करण्यात येते की, पठाण सईदखान अन्वरुल्लाखान ( गहाणखत करुन देणार ) खालील परिशिष्टातील स्थावर मालमत्तेचे गहाणखत करुन देण्याचे योजीले असून जे की, मौजे असदुल्लाबाद नांदेड, ता.जि. नांदेड पैकी सर्वे नं. २१ पैकी प्लॉट नं. ८५ चा उत्तरेकडील भाग ज्याचा म.न.पा क्र. १-२१-७०९/१ व ज्याचा पिन क्र. ४०२०११७२८८ व ज्याचा सी.टी.एस क्र. १०६८६ आहे ज्याचे क्षेत्रफळ लांबी पुर्व - पश्चिम ५० फुट म्हणजे १५.२४ मी. आहे. व रुंदी दक्षिण - उत्तर २० फुट म्हणजे ६.१० मी. आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १००० चौ. फुट म्हणजे ९२.९३ चौ.मी. आहे. ज्याच्या चर्तु:सिमा पुढील प्रमाणे आहेत.

पुर्वेस- प्लॉट नं. ७३, पश्चिमेस - ७.६१ मी. रुंद रोड, दक्षिणेस- प्लॉट क्र. ८५ चा उर्वरीत भाग, उत्तरेस - प्लॉट नं. ८४. सदरील मालमत्ता पठाण सईद खान अन्वरुल्ला खान हे माझे पक्षकार बंधन बँक लिमिटेड शाखा नांदेड यांच्या हक्कात गहाणखत करणार आहेत.

गहाणखत करुन देणार पठाण सईद खान अन्वरुल्ला खान यांच्याकडुन १. मुळ विक्रीखत क्रमांक १०९९/१९९६ दिनांक ०३.०४.१९९६ रोजीचा मुळ दस्त गहाळ / हरवला आहे २. मुळ विक्रीखत क्र. ७९९/२००७ दि. १३.०२.२००७ रोजीचा मुळ दस्त गहाळ/ हरवला आहे. त्यामुळे सदरील जाहीर प्रगटन देत आहे की, खालील स्थावर मिळकती बाबत कुठल्याही प्रकारचे हक्क जसे की खरेदी, अदलाबदल, गहाण ( नोंदणीकृत / संमीक बंधक इ.), बक्षीस, वारसा, कौटुंबीक व्यवस्था, पोटगी, हिस्सेदारी, ताबा, परवाना, भाडे तत्वावर, भाडे पट्टा, धारण, अधिकार, सुखवाद, प्रतिज्ञा, बेबंद इत्यादी किंवा या व्यतिरिक्त इतर कोणत्याही संदर्भात कोणाचेही हक्क गुंतलेले असतील अशा व्यक्तींनी त्यांच्याकडील असणाऱ्या संपुर्ण मुळ कागदोपत्री पुराव्यासहीत माझ्याकडे लेखी निवेदन ७ दिवसाच्या आत सादर करावे अशी विनंती करण्यात येत आहे. जर ७ दिवसाच्या आत सदरील लेखी आक्षेप प्राप्त न झाल्यास माझे अशील त्यास जबाबदार राहणार नाही व आपला हक्क सदरील नमुद परिशिष्टातील मिळकती बाबत सोडून दिला किंवा बेबंद केला असे समजण्यात येईल.

करीता हे जाहीर प्रगटन

| | |
|---|---|
| **मार्फत** | **जाहीर प्रगटन देणर** |
| **ॲड.आर.सी.पाडमुख** | **बंधन बँक लिमिटेड** |
| **धर क्र.२७५/२१ लेबर** | **शाखा नांदेड मार्फत** |
| **कॉलनी नांदेड** | **ब्रॅच मॅनेजर** |

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकाराने दिलेल्या माहिती व अधिकारावरुन सर्व जनतेच्या व संबंधितांच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात येते की, ना.वा.श.म.न.पा. हद्दीतील आनंद नगर, सहकारी भाडेकरू मालवी गृहनिर्माण संस्था, म. असदुल्लाबाद, नांदेड येथील संस्थेच्या मालकीच्या सर्व्हे नं.३९ मधील सि.टी. सर्व्हे नं. १००१६ पैकी प्लॉट नंबर २२ ज्याचे क्षेत्रफळ ५१० चौ मी. आहे. ज्याच्या एकत्रित चर्तुः सिमा पुर्वेस : प्लॉट नं. २९, पश्चिमेस : प्लॉट नं. २३,दक्षिणेस : रोड, ऊत्तरेस : प्लॉट नं. ३९

येणेप्रमाणे चतुः सिमेच्या आतील प्लॉट नंबर २२ हा संस्थेने संस्थेचे सभासद १) श्रीमती खुशबु भ्र. संदीप खोरीया व चि. आरुष पि. संदीप खोरीया यांच्या नावाने प्लॉट वाटप प्रमाणपत्राव्दारे वाटप केलेला असून त्याबाबत संस्थेने त्यांच्या नावे प्लॉट वाटप प्रमाणपत्र सुध्दा दिलेले आहे.

हे की, संस्थेचे वर नमुद सभासदानी सदरील प्लॉट नंबर २२ हा त्यावरील बांधकाम केलेल्या आर.सी.सी घराचे बांधकामासह प्रस्तावित खरेदीदार सौ. जोत्स्ना भ्र. सुधीर नेरळ रा. प्लॉट नं.४, मनोहर, बाजीप्रभूनगर रामनगर, नागपुर यांना कायमचे हस्तातरण/विक्री करण्याचा करार केला आहे. त्याबाबत श्रीमती खुशबु भ्र. संदीप खोरीया यांनी संस्थेकडे त्यांचा स्वतःच्या सभासदत्वाचा राजीनामा, सौदाचिठ्ठीची प्रत, तसेच नवीन सभासद करून घेण्याबाबतचा प्रस्तावित खरेदीदार यांचा अर्ज इ. कागदपत्र सादर करुन संस्थेच्या संमतीने सौ. जोत्स्ना भ्र. सुधीर नेरळ, रा. रामनगर, नागपुर यांच्या नावे रजिस्टर्ड कव्हेंन्स डीड व्दारे हस्तांतरण करुन देण्याबाबत व प्लॉट वाटप प्रमाणपत्र देण्याबाबत संस्थेकडे विहीत नमुण्यात अर्ज व इतर अवश्यक ती कागदपत्र सादर केलेली आहेत.

तरी वर नमुद प्लॉट नंबर २२ क्षेत्रफळ ५१० चौ मी. हा वरनमुद प्रमाणे हस्तांतर करण्यास कोणाचा काही आक्षेप अथवा ऊजर असल्यास अथवा सदर प्लॉटवर कोणत्याही बँकेचा अथवा खाजगी संस्थेचा बोजा, गहाणखत अथवा इतर कोणतेही हितसंबंध असल्यास संबधितानी हे जाहीर प्रगटन प्रसीध्द झाल्यापसुन ८ दिवसाचे आत आपला आक्षेप अथवा उजर संस्थेच्या कार्यालयात लिखित स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप हे संस्थेवर बंधनकारक राहणार नाहीत. सबब सर्व जनतेच्या माहितीस्तव हे जाहीर प्रगटन प्रसिध्द केले आहे.

| | |
|---|---|
| **मार्फत** | **जाहीर प्रगटन देणार** |
| **ॲड.नरेश साहेबराव देशमुख** | **अध्यक्ष/सचिव** |
| **राजेंद्रनगर नांदेड** | **आनंदनगर सहकारी भाडेकरू मालकी** |
| **मो.९४२२१७००३०** | **गृहनिर्माण संस्था म.असदुल्लाबाद** |

## जाहीर समन्स

जाहीर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की हिमायतनगर तालुक्यातील मौजे धानोरा (ज.) येथील शे. सर्वे. न.५० (भाग २) क्षेत्र २ हेक्टर २४ आर ही शेत जमीन उमाजी जेमला राठोड, बाबुसिंग जेमला राठोड (मयत) त्यांचे वारस रघुसिंग बाबूसिंग राठोड रा. बोरगडी तांडा न. ०२ यांना डिक्लेअर कुळ आधारे मिळालेली आहे त्यावर तब्बल ४५ वर्षा पासून ताबा आहे व तसेच प्रमोद विठ्ठल रायेवार (हिमायतनगर) यांच्या कडून सदर जमीन सौदा चिठ्ठी आधारे घेतलेली आहे त्यांना मोबदल्याची रक्कम देखील पंचासमक्ष अदा केलेली आहे परंतु त्यांनी आमच्या नावाने रजिस्ट्री करून दिलेली नाही ताब्या आधारे सदर जमिनीत आम्ही लागवड करीत असल्यामुळे मा. तहसीलदार हिमायतनगर यांनी दि.११.०६.२०१९ व ०१.११.२०२२/२३ रोजी ७ ब चे आदेश निर्गमित करून आमचा ताबा कायम असल्याचा निर्णय दिलेला आहे परंतु प्रमोद विठ्ठल रायेवार यांनी त्यांच्या नावाचा ७/१२ असल्याचा गैर फायदा घेऊन दलाला मार्फत सदर जमीन विक्री करण्याचा बेतात आहे व सदर प्रकरण मा.दिवाणी न्यायालय हिमायतनगर येथे न्याय प्रविष्ट आहे म्हणून कुणीही त्यांच्याशी खरेदी विक्री चे व्यवहार करू नये याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

## जाहीर प्रगटन

जाहीर सुचने द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की हिमायतनगर तालुक्यातील मौजे धानोरा (ज.) येथील शे. सर्वे. न.५० (भाग २) क्षेत्र २ हेक्टर २४ आर ही शेत जमीन उमाजी जेमला राठोड, बाबुसिंग जेमला राठोड (मयत) त्यांचे वारस रघुसिंग बाबूसिंग राठोड यांना डिक्लेअर कुळ आधारे मिळालेली आहे त्यावर तब्बल ४५ वर्षा पासून ताबा आहे व तसेच प्रमोद विठ्ठल रायेवार (हिमायतनगर) यांच्या कडून सदर जमीन सौदा चिठ्ठी आधारे घेतलेली आहे त्यांना मोबदल्याची रक्कम देखील पंचासमक्ष अदा केलेली आहे परंतु त्यांनी आमच्या नावाने रजिस्ट्री करून दिलेली नाही ताब्या आधारे सदर जमिनीत आम्ही लागवड करीत असल्यामुळे मा. तहसीलदार हिमायतनगर यांनी दि.११.०६.२०१९ व ०१.११.२०२२/२३ रोजी ७ ब चे आदेश निर्गमित करून आमचा ताबा कायम असल्याचा निर्णय दिलेला आहे परंतु प्रमोद विठ्ठल रायेवार यांनी त्यांच्या नावाचा ७/१२ असल्याचा गैर फायदा घेऊन दलाला मार्फत सदर जमीन विक्री करण्याचा बेतात आहे व सदर प्रकरण मा.दिवाणी न्यायालय हिमायतनगर येथे न्याय प्रविष्ट आहे म्हणून कुणीही त्यांच्याशी खरेदी विक्री चे व्यवहार करू नये याद्वारे सूचना देण्यात येत आहे.

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...

किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



# नांदेडमध्ये लवकरच धावणार शहर बस

## उपमुख्यमंत्री शिंदे यांच्याशी आ. बोंढारकर यांची सकारात्मक चर्चा

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील अंतर्गत प्रवासासाठी शहर बस सेवा पुन्हा सुरू करण्याच्या अनुषंगाने नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आ. आनंदराव पाटील बोंढारकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेतली. या भेटीत सकारात्मक चर्चा झाल्याचे आ. बोंढारकर यांनी सांगितले असून, लवकरच नांदेड शहरात पुन्हा एकदा सिटी बस धावेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



नांदेड शहराचा वाढता विस्तार आणि प्रवाशांची संख्या लक्षात घेता शहरात शहर बस सेवा असणे अत्यावश्यक झाले आहे. खासगी ऑटोतून प्रवास करताना प्रवाशांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो आहे. शिवाय रिक्षा चालकांची मनमानी आणि उद्धटपणा यामुळे होणारे वाद लक्षात घेता नांदेडमध्ये शहर बस सेवा सुरू व्हावी यासाठी आ. बोंढारकर यांचे प्रयत्न सुरू आहेत. शिवाय नांदेड शहरातील अनेक शासकीय कार्यालय आता शहराबाहेर स्थलांतरित होत आहेत. न्यायालय नव्या वास्तूत म्हणजे कौठा परिसरात येत्या काही महिन्यांमध्ये स्थलांतरित होईल. विष्णुपुरी येथील रुग्णालय, विद्यापीठ, आरटीओ कार्यालय असे अनेक महत्त्वाचे कार्यालय शहराबाहेर आहेत. त्यामुळे कामानिमित्त या ठिकाणी प्रवास करणाऱ्या नागरिकांना आर्थिक भार सहन करावा लागत आहे. ही बाब लक्षात घेता राज्य परिवहन महामंडळाची शहर बस सुरू करावी यासाठी आ. बोंढारकर यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन मागण्यांचे निवेदन दिले. या भेटीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि परिवहन मंत्री सरनाईक यांनी सकारात्मक चर्चा केली असून लवकरच नांदेडमध्ये शहर बस सुरू करण्याच्या अनुषंगाने संबंधितांना सूचित करण्यात येईल अशी माहिती त्यांनी दिली.

# किनवट न्यायालयासाठी ८३.४२ लाखांचा निधी मंजूर

## खा. अशोक चव्हाण यांच्या मागणीला पालकमंत्र्यांचा प्रतिसाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** किनवट न्यायालयाचे कामकाज नगरपालिकेच्या इमारतीमध्ये सुरळीत सुरू करण्यासाठी आवश्यक भौतिक सुविधा निर्मितीसाठी तब्बल ८३ लाख ४२ हजार ७४० रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. माजी मुख्यमंत्री व खासदार अशोकराव चव्हाण यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे केलेल्या मागणीला ७ ऑगस्ट रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली.

सध्या किनवट न्यायालय निजामकालीन जीर्ण इमारतीतून स्थलांतरित होऊन नगरपालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज मंगल कार्यालयात तात्पुरते चालते आहे. मात्र तिथे सुविधा अपुऱ्या असल्याने न्यायालयीन कामकाजात अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर चार स्वतंत्र न्यायालयीन कक्ष दोन दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, एक जिल्हा न्यायाधीश आणि एक दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर उभारण्याचे नियोजन आहे. नगरपालिकेकडून सादर केलेल्या अंदाजपत्रकातून न्यायदालन, न्यायाधीश कक्ष, अभिलेख कक्ष तसेच विविध विभागीय कार्यालये सुसज्ज करण्याचा आराखडा आहे.

सदर मागणीचे गांभीर्य पाहता खा. चव्हाण यांनी हा विषय पुढे नेताच ना. सावे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत निधी मंजुरीची प्रक्रिया गतिमान केली.

किनवट व माहूरसारख्या दुर्गम भागातील नागरिकांना न्याय मिळविताना होणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार असून, नवीन इमारतीमुळे न्यायालयीन कार्यक्षेत्र अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक होईल. न्यायदान प्रक्रिया गतिमान होईल.

खा. चव्हाण यांनी विकास कामांबाबत दाखवलेली तत्परता आणि ना. सावे यांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे हा प्रस्ताव वेगाने मार्गी लागला. ग्रामीण भागातील जनतेस न्यायप्राप्तीची सोय अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि आधुनिक होणार असून, न्यायदान प्रक्रिया गतिमान होईल, असा विश्वास नागरिक व वकीलवर्गाने व्यक्त केला आहे.

# २० लाख ५३ हजारांचे १६० अँड्रॉइड मोबाईल हस्तगत; सायबर शाखेची कामिगरी

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यातील सार्वजनिक ठिकाणाहून व बाजारातून महागडे मोबाईल गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध घेण्याकरिता पोलीस अधीक्षक यांनी सायबर ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत सप्रे यांना आदेशीत केले होते. त्यानुसार सायबर सेल, स्थागुशा आणि जिल्ह्यातील सर्व पोस्टे यांचे पथक तयार करुन मिसिंग मोबाईलचा शोध घेण्याची मोहीम राबविण्यात आली होती. येथील पोलीस स्टेशन व स्थागुशा यांच्या पथकाने जिल्ह्यातील गहाळ झालेल्या मोबाईलचा शोध वेगवेगळ्या ठिकाणी जाऊन नांदेड जिल्ह्यातील एकूण १६० मोबाईल किंमत २० लाख ५३ हजार रुपयाचे हस्तगत केले.

सायबर शाखेने जप्त केलेले मोबाईल शुक्रवार, दि. ८ ऑगस्ट रोजी एकत्रितरीत्या पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते वाटप केले. शोध झालेल्या मोबाईलचे IMEI



क्रमांकांची माहिती नांदेड पोलीस दलाचे Nanded Police या Facebook Page d Twitter वर टाकण्यात आली आहे. त्यापैकी नागरिकांनी आपल्या हरवलेल्या मोबाईलचा IMEI क्रमांक ओळखून सायबर पोलीस स्टेशन नांदेड येथून मोबाईल घेऊन जाण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव नांदेड, डॉ. अर्चना पाटील भोकर, गृह पोलीस उपअधीक्षक डॉ. आश्विनी जगताप, पोलीस निरीक्षक वसंत सप्रे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन सायबर पो.उप.नि. मारोती चव्हाण, पोलीस अंमलदार राजेंद्र सिटीकर, दीपक ओढणे, महेश बडगु, कांचन कसबे, रेश्मा पठाण, शुभांगी जाधव, दावीद पिडगे, काशीनाथ कारखेडे, व्यंकटेश सांगळे, ज्ञानेश्वर यन्नावार, दिपक राठोड, राम शेंडगे यांनी पाडली आहे.

# तीन तोळे सोन्याचे दागिने घेऊन दोन ठक फरार; गुन्हा दाखल

**लोहा (प्रतिनिधी) –** लोहा शहराच्या उत्तरेस ५ कि. मि. अंतरावर असलेल्या मौजे कारेगाव येथील एका शेतकरी महिलेस अज्ञात मोटारसायकस्वारांनी लुटून ते पसार झाले. या प्रकरणी लोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकरणातील दोन ठकबाजांनी कारेगाव येथील कृष्ण मंदिरात गुप्त दान करायचे म्हणून तीन तोळे सोने घेऊन फसवणूक करून पोबारा केला. ही घटना गुरुवार, दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी घडली.

कारेगाव येथील महिला सौ. गिरजाबाई अरुणराव दिघे वय ६२ वर्षे व्यवसाय शेती व घरकाम रा. कारेगाव, ता. लोहा यांनी लोहा पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत नमूद केले की, दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९ वाजता घराबाहेर जात असताना कारेगाव येथील कृष्ण मंदिराजवळ दोन अनोळखी इसम मोटारसायकलवरुन त्यांच्याजवळ आले व त्यांनी मंदिर कशाचे आहे. त्यावेळी त्यांना कृष्ण मंदिर आहे असे म्हणताच त्यांनी आम्हांला दर्शन घ्यायचे आहे. मंदिर उघडा असे म्हटले. श्रावण महिना असताना कुणीतरी भाविक असतील म्हणून त्यांनी मंदिराचे दरवाजे उघडून दिले. ते दोन अनोळखी इसम मंदिरात गेले. त्यानंतर त्यांनी फिर्यादीला मंदिरात बोलावले व आम्हाला गुप्त दान करायचे म्हणून दोघांच्याही खिशातले पैसे काढून त्याच्या जवळील फुलांच्या कॅरीबॅगवर ठेवले. त्यावेळी त्या दोघांनी गुप्तधनासाठी सुवर्णदान लागते. त्यासाठी तुमच्या गळ्यातील पोत काढुन द्या व पूजा झाल्यावर तुम्ही सर्व घेऊन टाका, असे म्हटले तेव्हा फिर्यादी महिलेने विश्वासाने भावनिक होऊन त्यांच्या गळ्यातील सोन्याच्या मन्याची एक तोळ्याची पोत व सोन्याची एक तोळ्याची एकदानी, सोन्याचे एक तोळ्याचे झुमके व वेल असे फुलांच्या कॅरीबॅगवरील पैशावर ठेवले. त्यावेळी त्यातील एकाने कॅरीबॅगची गाठ मारुन देवासमोर ठेवले व पूजा झाल्यावर सर्व तुम्ही घ्या म्हणाले. पूजा करुन देवाच्या पाया पडून फिर्यादी महिलेला दडवंत म्हणून ते दोघे इसम निघून गेले.

# सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियासाठी वीर परिवार सहायता योजना

**नांदेड (प्रतिनिधी)–** सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि यांच्या कुटुंबियांसाठी वीर परिवार सहायता योजनेच्या अंमलबजावणीसाठी नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात कायदेशीर सेवा केंद्र स्थापन केले आहे. लाभार्थ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे येऊन अर्ज सादर करावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी केले आहे.

सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि यांच्या कुटुंबियांना नॅशनल लीगल सर्व्हिसेस अथॉरिटी मार्फत वीर परिवार सहायता योजना–२०२५ मोफत आणि सक्षम कायदेशीर सेवाप्रदान करीत आहे. या योजनेचा उद्देश देशाचे संरक्षण करणारे सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबियांना प्रभावित करणाऱ्या वैयक्तिक आणि नागरी हक्काच्या कायदेशीरबाबींमध्ये सेवा प्रदान करणे आहे.

ही योजना सेवारत सैनिक, माजी सैनिक आणि यांच्या कुटुंबियांना मालमत्ता आणि कौटुंबिक वाद, वारसा हक्काचे आणि वारसाचे प्रश्न, आर्थिक फसवणुकीचे प्रकरणे, कल्याणकारी योजनेखालील लाभ मिळवणे, दिव्यांग अधिकार नियम २०१६ अंतर्गत हक्क मिळवून देण्यासारख्या विविध कायदेशीर बाबीमध्ये मदत पुरवते.

या योजनेत डिजिटल सुविधांचा वापर करण्यात आला आहे. जसे छरश्रीर च्या लीगल सर्विसेस मॅनेजमेंट सिस्टम पोर्टलद्वारे ई–फायलिंग, ई–कोन्सिलिंग, ई–मेडीएशन आणि ई–लोक अदालत या उपाय योजनेमुळे दुर्गम भागातही न्याय मिळवणे सोपे होईल.

ही योजना केवळ एक कल्याणकारी उपाय नाही तर देशाच्या संरक्षणासाठी निस्वार्थ सेवा करणाऱ्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारी कृती आहे. या योजनेमुळे देशाचे संरक्षण करणाऱ्या जवानाच्या कुटुंबियांना त्यांच्या अनुपस्थित ही विश्वसनीय कायदेशीर मार्गदर्शन उपलब्ध होईल.

# जबरी चोरीचे पाच गुन्हे उघड; दहा लाखांचा मुद्देमाल जप्त, विमानतळ पोलिसांची कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील विमानतळ आणि शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जबरी चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांना विमानतळ पोलिसांनी अटक केली. चोरट्यांकडून एक दुचाकी आणि सोन्याचे दागिने (सोनसाखळी आणि झुमके) असा दहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यातील चार जबरी चोरी ह्या विमानतळ तर एक शिवाजीनगर ठाण्याच्या हद्दीत केल्याची माहिती पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी शुक्रवारी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत संजीवनी उमाकांत चोले (वय ३३ रा. गीतानगर), पुष्पाबाई सायना गोपरे (वय ८० रा. शारदा नगर), उर्मिला लक्ष्मण सोनटक्के (वय ५५ राहणार नाईक नगर) आणि परवेज युसूफखान पठाण (वय ३३ राहणार आसरानगर सांगवी) यांना रस्त्यात अडवून त्यांच्या गळ्यातील सोनसाखळ्या अनोळखी दुचाकीस्वार चोरट्यांनी जबरीने चोरल्या होत्या. याप्रकरणी विमानतळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या प्रकरणी चोरट्यांना जेरबंद करण्याच्या सूचना पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांना देण्यात आल्या होत्या. कामठेवाड यांनी आपले सहकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष जोंधळे, हवालदार शेख जावेद, बालाजी पांचाळ, राजेश माने, पाकलवाड, वाडकर आणि नंदगावे तसेच सायबर सेलचे राजू सिटीकर यांच्या मदतीने पथक तयार करून या जबरी चोरी करणाऱ्या



चोरट्यांची गोपनीय माहिती काढून मुसक्या आवळल्या. त्यात महेश बबन देवकते (वय २६ रा. आंबानगर सांगवी) आणि सय्यद जाकीर सय्यद जफर (वय २८ रा. मेहबूबनगर नांदेड) समावेश आहे. या दोघांची कसून चौकशी केल्यानंतर त्यांच्याकडून सोन्याचे दागिने जवळपास ८२ ग्राम वजनाचे आणि एक दुचाकी असा दहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. विशेष म्हणजे आरोपी सय्यद जाकीरविरुद्ध वीस गुन्हे दाखल असून, त्यातील दहा गुन्हे फक्त विमानतळ ठाण्याच्या हद्दीतील आहेत तर महेश देवकतेविरुद्ध पाच गुन्हे दाखल असून, चार विमानतळ पोलीस ठाण्यातील असून, एक शिवाजीनगर ठाण्यातील जबरी चोरी, घरफोडी असे गंभीर गुन्हे दाखल आहेत.

# उपमुख्यमंत्री अजित पवार व आ. चिखलीकर यांचे वाढदिवसानिमित्त होटाळकर यांच्याकडून विविध उपक्रम

## आरोग्य शिबीर, विद्यार्थिनींच्या स्पर्धा, वृक्षारोपण

**नांदेड (प्रतिनिधी)–** राष्ट्रवादीचे नेते उपमुख्यमंत्री अजित पवार व आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त नायगाव येथे आरोग्य शिबीर, नेत्रतपासणी, रक्तदान शिबीर, वृक्षारोपण, तालुकास्तरीय चित्रकला स्पर्धा, शाडू मातीपासून गणेश मूर्ती तयार करणे यांसह विविध उपक्रम राबविले. राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा वाढदिवस नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून साजरा केला.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, प्रतापराव पाटील चिखलीकर व प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या वाढदिवसानिमित्त ८ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता स्व. डी. बी. पाटील स्मृतिस्थळ, मिलेनियम पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज नायगाव येथे विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी आ. मोहनअण्णा हंबर्डे, माजी आ. ओमप्रकाश पोकर्णा, प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर होते. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाळासाहेब पाटील रावणगावकर,



माधव पावडे, सौ. वैशालीताई चव्हाण, वसंत सुगावे, राष्ट्रवादीच्या महिला जिल्हाध्यक्ष सौ. सुनंदाताई जोगदंड, राष्ट्रवादीच्या शहर जिल्हाध्यक्ष सौ. सुरेखाताई पाटील, अॅड. मुक्तेश्वर धोंडगे, बालाजी पाटील शिंदे, स्वप्नील चव्हाण, मोहम्मद खान पठाण, दादाराव ढगे, विनायकराव पाटील शिंदे, दिगंबर पाटील शिंदे, बालाजी पाटील कदम, मारुती वाडेकर, शिवचरण डांगे, रमेश गांजापूरकर, स्वप्नील इंगळे, प्रभाकर भांजेवाड, अॅड. बाळासाहेब सोनकांबळे, साहेबराव धनगे, दीपक कदम, हौसाजी शिंदे, जीवन चव्हाण, ज्ञानेश्वर कदम, श्रीकांत शिंदे, प्रदीप पवळे यांच्यासह अन्य कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

# आनंद देऊळगावकर यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार प्रदान



**मुदखेड (प्रतिनिधी) –** महसूल दिनानिमित्त प्रशासकीय क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल भोकरचे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांना उत्कृष्ट उपविभागीय अधिकारी व मुदखेडचे तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना उत्कृष्ट तहसीलदार पुरस्कार प्रदान करण्यात आला.बुधवार, दि. ६ ऑगस्ट रोजी नांदेड येथील एका विशेष समारंभात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांचे हस्ते शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात हा कार्यक्रम पार पडला.

मुदखेडचे तहसीलदार म्हणून आनंद देऊळगावकर यांनी दि. ७ फेब्रुवारी २०२५ रोजी पदभार स्वीकारला. त्यांच्या काळात विविध शासकीय योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, नागरिकांच्या समस्यांचे जलद निराकरण करणे, सोबतच शासकीय कारभारात पारदर्शकता आणण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण प्रयत्न केले. त्यांनी मुदखेड तालुक्यात शासनाच्या शंभर दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सातबारावरील नावात दुरुस्तीसाठी विशेष मोहीम हाती घेतली होती. या अंतर्गत मुदखेड तालुक्यातील जवळपास ६५० च्या वर सातबारावरील नावात दुरुस्ती करून सर्व गावांचे रेकॉर्ड अपडेट करून गावांचे D4 डिक्लेरेशन करण्यात आले. ई कार्यालयातून फाईल जनरेट करुन त्याद्वारेच कामकाज करण्यात आले. मुदखेड तालुका हा नांदेड जिल्ह्यातून १६ तालुक्यांतून पहिला ठरला असल्यामुळे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी व मुदखेड तहसीलदार आनंद देऊळगावकर यांचे नाव उत्कृष्ट तहसीलदार म्हणून पुरस्कारासाठी जाहीर करण्यात आले व नांदेड येथील शंकरराव चव्हाण प्रेक्षागृहात विशेष कार्यक्रमात उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी व मुदखेड येथील तहसीलदार आनंद देऊळगावकर यांना हा पुरस्कार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

यावेळी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, पी. एस. बोरगांवकर, अनन्या रेड्डी, मेघना कावली, किरण अंबेकर, महेशकुमार डोईफोडे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

# उपविभागीय अधिकारी मेंगशेट्टी यांचा सर्वोत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून गौरव

**भोकर (प्रतिनिधी)–** दरवर्षी दिलेल्या उद्दिष्टाची पूर्तता करणाऱ्या व विशेष कार्य करणाऱ्या महसूल यंत्रणातील कार्यरत अधिकाऱ्यांच्या कार्याचा गौरव व्हावा, त्यांच्या अपेक्षांच्या ओझ्यातून उतराई होण्याची संधी शासनाला मिळावी, महसूलच्या कार्यरत यंत्रणेला पुढील उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी ऊर्जा मिळणारे काम महसूलदिनी व्हावे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून दरवर्षी १ ऑगस्ट रोजी राज्य शासनाच्या आदेशाने जिल्हा महसूल प्रशासनाच्या वतीने महसूल दिन साजरा केला जातो. याच अनुषंगाने नांदेड जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडून दि. ६ ऑगस्ट २०२५ रोजी शंकरराव चव्हाण सभागृह नांदेड येथे महसूल दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील महसूल प्रशासनात सर्वोत्कृष्ट सेवा बजावणाऱ्या अधिकारी, कर्मचारी यांचा गौरव करण्यात आला. या अनुषंगाने



सर्वोत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून भोकर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी मेंगशेट्टी यांचा जिल्हाधिकारी राहूल कर्डिले व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी राहूल कर्डिले, उद्घाटक पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांची उपस्थिती होती. तसेच विशेष अतिथी म्हणून जि. प. नांदेडच्या मुख्यकार्यकारी श्रीमती मेघना कावली, नांदेड वाघाळा मनपाचे आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर जिल्हाधिकारी टी. एस. बोरगावकर उपस्थित होते. जिल्ह्यांतर्गत येणाऱ्या सोळा तालुक्यातील आठ उपविभागाचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, मंडळाधिकारी, तलाठी, कारकून, शिपाई, महसूल सेवक आदींची उपस्थिती होती.

कुठलेही कार्य करत असताना त्यांचं सुयोग्य नियोजन, त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास आणि योग्य मार्गदर्शन ह्या गोष्टी मिळाल्या की, ते कार्य नक्कीच फळारूपाला येते. मग ते 'प्रशासन आपल्या गावी' या उपक्रमातून असो किंवा मिशन आपुलकी' च्या माध्यमातून. माणुसकीची नाळ जोडणे असो. यासह विविध उपक्रम, योजनाच्या माध्यमातून गावं समृध्द करणे असो किंवा मग 'निवडणुकीच्या' माध्यमातून लोकशाही बळकट करणे असो, अथवा 'बीजारोपण,वृक्षारोपण' करून निसर्गाचा समतोल राखण्याचा निर्धार असो अथवा नैसर्गिक आपत्तीत मदत कार्य असो, मुख्यमंत्री शंभर दिवस कृती उपक्रमाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविणे, जिल्हा परिषद शाळा प्रकाशमय करणे या सर्व कार्यात भोकर महसूल प्रशासन सर्वोत्कृष्ट ठरले आहे. भोकर उपविभागात उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंशेट्टी यांनी तहसीदार विनोद गुंडमवार यांच्या विशेष सहकार्याने व महसूल विभागाच्या मार्फत अनेक समाजहितकारक कार्य केले आहे. त्याचे फलित म्हणून जिल्हाधिकारी कार्यालयाकडून साजरा करण्यात आलेल्या या डेस्टिनेशन 'महसूल दिन' कार्यक्रमात जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या हस्ते सर्वोत्कृष्ट उपजिल्हाधिकारी म्हणून भोकर उपविभागाचे उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी यांचा गौरव करण्यात आले.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com